विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ८३**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पाचवे / अंक ८ / जुलै २००४

*संपादकीय*

## बातम्याच बातम्या चहूकडे....!


दूरदर्शनच्या माध्यमातून वृत्त वाहिन्या नावाचा जो प्रकार घराघरात वहात असतो. त्या वृत्तवाहिन्यांवरून झिरपत रहाणाऱ्या बातम्या हा आज खरोखरच विचार करायला लावेल असा विषय आहे. सर्वच वृत्तवाहिन्यांवाले एकदम बीबीसी, सीएन्एन्शी स्पर्धा करायला निघालेले. त्यामुळे हाती आलेली बातमी अधिक तपशीलात सांगण्याच्या भानगडीत त्या दाखविल्या जाणाऱ्या बातम्या भडकपणा किंवा विकृतीचे रूप कधी धारण करतात हेच बहुधा या मासमिडियावाल्यांना कळत नसावे. या बातम्यांची भाषा, त्या सांगणाऱ्या वृत्त निवेदकांचे हावभाव पाहिले की असं वाटत रहातं की हे तर काहीच नाही, यापेक्षाही काहीतरी भयानक....

'अश्लील चित्रपटाना विरोध' ही बातमी अनेकवार दाखविता दाखविता त्या चित्रपटातील भडक दृश्ये अनेकवार दाखवायची. (आपण अर्ध्यांहून अधिक चित्रपट पाहिलाच असेच वाटायला लागते.) उलट सुलट मते प्रक्षेपित (लाइव्ह!) करायची, एखाद्या पक्षाला, त्याच्या कार्यक्रमाला इतकं महत्त्व द्यायचं की असं वाटतं की जणू काही या पक्षानेच आपला 'प्राइम टाईम स्पॉन्सर' केला आहे की काय ? आज हा पक्ष, उद्या तो पक्ष, आज हा खून, उद्या तो अपघात, काहीजणांनी काहीतरी वागायचं त्याचा दुसऱ्याने काहीतरी अर्थ काढून मोर्चे, संप करायचे ...आणि हे सर्व पाहिलं, पहात राहिलं की स्वतःला 'अपडेटेड' समजायचे!!

सकारात्मक विचार, विधायक विचारांना चालना देईल असंही काही घडतं असतं. विशुद्ध अभ्यासाच्या भावनेतून कोणी काही करत असतं. त्यांची दखलही चुकून माकून हे लोक घेतात. पण पुसटशी.. जाणवेल न जाणवेल अशी किंबहुना आजकाल कांही चांगल घडत असेल यावरचा विश्वासच उडावा असे प्रक्षेपण चोवीस तास चालू असते.

काही पारंपारिक अभ्यासाचे विषय, भाषा, संस्कृती आहेत. त्यांच्या क्षेत्रातही बरेच नवे घडले असते

(कव्हर २ वर)



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पाचवे / अंक ८ / जुलै २००४

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ८ वे / अंक ११वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | धर्मराज्यस्थापक श्रीकृष्ण | शं. वा. मठ | ३ |
| २) | सोळा स्मारके | सौ. मंजिरी दांडेकर | ८ |
| ३) | डॉ. मो. दि. पराडकर यांचे आत्मकथन | डॉ.मो. दि. पराडकर | ११ |
| ४) | महाभारतातील समस्या | | १७ |
| ५ ) | सार्वजनिक ग्रंथालयातील वाचकांची अभिरुची कशी वाढवावी | अंजली ना. फडके | २५ |
| ६) | ग्रंथालयाचा ज्ञानकोश - एक महान कार्य | सौ. दीपाली हिंदळेकर | २७ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २९ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# धर्मराज्यस्थापक श्रीकृष्ण

*भगवान श्रीकृष्णाचे वास्तव चरित्र काय होते, याचा अभ्यासपूर्ण विचार मांडणाऱ्या लेखमालेतील हा पाचवा लेख*

*- संपादक*

(लेखांक पाचवा)

## श्रीकृष्णाला संधि अभिप्रेत होता काय?

संजय शिष्टाईसाठी आला. त्याने पांडवाना युद्ध न करण्याचा उपदेश केला. त्याचा परिणाम थोडा बहुत पांडवावर झाला. हा सारा कुटील डाव उधळून लावण्यासाठी श्रीकृष्णाने स्वत: कौरवांकडे शिष्टाईसाठी जावयाचे ठरविले.

अर्जुना, माझ्या जन्माचे दिव्य कारण तुला पूर्णपणे माहित आहे. पृथ्वीवरील दुष्ट लोकांचा भार नष्ट करण्यासाठीच माझा जन्म झाला आहे. तर मी या लोकांना जगू देणे, कसे शक्य आहे.त्यांना ठार मारल्यावाचून माझे जीवित कार्य पूर्ण होऊ शकत नाही. (भूभार अपहारार्थ अवतरणम्)

द्यूतात कौरवांनी पांडवांच्या राज्याचा अपहार केला. या त्यांच्या घोर अपराधाबद्दल कदाचित मी ते क्षम्यही मानले असते. परंतु त्यापेक्षाही कौरवानी एक भयंकर अपराध केला. तो अपराध म्हणजे द्रौपदीची विटंबना होय. मी दूर असता, अब्रू जाण्याच्या प्रसंगी 'हे गोविंदा' म्हणून द्रौपदीने मला जी आर्त हाक मारली ती माझ्या हृदयातून कधीही जाणार नाही. त्या हाकेचे माझ्यावर मोठे ऋण आहे आणि कौरवांच्या हत्येवाचून हे ऋण कधीही नष्ट होणारे नाही. श्रीकृष्णाला या कारणास्तव कौरव वध्य वाटत होते.

त्रयोदशे च निवृत्ते पुनरेव यथोचितम् ।स्वराज्य प्रतिपत्तव्यं इतरै: अथ इतरै: ।

तेरा वर्षानंतर जेवढे पांडवांचे राज्य असेल तेवढे त्यांनी द्यावे. द्यूतावेळची ही प्रतिज्ञा होती. हे राज्य कौरवांनी आता पांडवांना द्यावयास पाहिजे. पाच गावावर संतुष्ट होण्याची युधिष्ठिराची सिद्धता असली तरी ती कल्पना श्रीकृष्णाला पूर्णपणे अमान्य होती. श्रीकृष्णाला संधि नको होता. तो होईल असेही वाटत नव्हते, असे असता श्रीकृष्ण शिष्टाईला का गेला?

## कृष्ण शिष्टाईची भूमिका

पशुत्व नियंत्रित करण्यास, हळूहळू ती मानवतेतून नष्ट करावयास राज्य संस्थेची आवश्यकता असते. पण राज्य संस्थाच जर पशुवृत्तीची असली तर ती नष्ट करणे हाच एक मार्ग असतो. सत्ता शून्य पशुत्व, संस्कारांनी सुधारता येणे शक्य असते. ते नियंत्रित करता येते. पण सत्तात्मक पशुत्व हे नियंत्रित होणे केवळ दुरापास्त असल्यामुळे ते नष्ट करणे हाच एकमेव मार्ग असतो. श्रीकृष्ण ही परमेश्वरी काळ शक्ती होती. दुष्ट राजसत्तांचा संहार हेच तिचे कार्य होते. हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

## कृष्ण शिष्टाईची कारणे

पहिले महत्त्वाचे कारण युधिष्ठिराचा आग्रह. तो संघर्षाचा नेता होता. त्याचा आग्रह मान्य करणे अगत्याचे होते.

तत्र न: प्रथम: कल्प: यद्वयं ते च माधव ।प्रशान्ता: शमभूताश्च प्रियं वां अश्नुवामहि ।

शांततेने यश न आल्यास केवळ आत्यंतिक मार्ग म्हणून युद्धाच्या रौद्र कर्माची कास धरून आम्ही कौरवांना ठार मारावे हा राज्य मिळविण्याचा दुसरा मार्ग.

तत्रैषा परमाकाष्ठा रौद्रकर्मक्षयोदया ।यद् वयं कौरवान् हत्वा तानि राष्ट्रानि अवाप्नुम: ।

पहिले कारण युधिष्ठिराची तह करण्यासंबंधी उत्कट इच्छा. दुसरे कारण लोकापवाद टाळणे.

श्रीकृष्ण उभय पक्षाचा नातलग. त्याच्या शब्दाला विशेष मान होता. आपल्या सामर्थ्याचा उपयोग करून कौरवाना संधि करावयास भाग पाडू शकेल, असा अनेकांचा विश्वास बलरामाला देखील असे वाटत होते.

दुर्योधनाची पापी वृत्ती मला माहीत आहे. पण मी प्रयत्न केले नाहीत म्हणून कोणी दोष देऊ नये एवढीच माझी इच्छा आहे. त्यासाठीच मी स्वत: जावयाचे ठरविले आहे, असे श्रीकृष्ण युधिष्ठिराला सांगतो. श्रीकृष्णाची ही इच्छा पूर्ण सफल झाली तरी गांधारीने ठपका दिलाच व उत्तंक ऋषींने शाप देण्याचे ठरविले.

जुलमी सत्ता नष्ट करण्याचा प्रजेला हक्क आहे, हे कंसाच्या वधाने सिद्ध झालेच आहे. राजसिंहासनाच्या स्वयंभूपणाचे अनियंत्रिततेचे पूर्णपणे युग संपले. धर्मसत्तेचे युग सुरु झाले. राजा सुद्धा दंडनीय असू शकतो हे महान वैचारिक व व्यावहारिक परिवर्तन श्रीकृष्णाने घडविले. त्यात स्वयंभू व अनियंत्रित सत्तेच्या पुरस्कर्त्यांना स्वत:चा मृत्यू स्पष्टपणे दिसत होता. त्यामुळे श्रीकृष्णाशी वैर करणे त्यांना क्रमप्राप्त होते. जरासंधाच्या मृत्यूनंतर ते एकटे व उघडे पडले. जरासंधाच्या वधाने मोडलेला राजसंघ दुर्योधनाच्या नेतृत्वाखाली उभारला व श्रीकृष्णाचे व आपले वैर सदाचे संपावे, म्हणून ते एकत्रित झाले.

### श्रीकृष्णाने हे केले

कौरव सभेत जाऊन भीष्म, द्रोण, कृप आदि स्वत:ला न्यायी, धार्मिक, कर्तव्य परायण समजत, त्यांच्या अंत:करणात कौरवांच्या बाजूने लढणे अन्याय वृद्धिंगत करणारे आहे हा स्पष्ट भाव निर्माण करून युद्धाची उत्साह शक्ती पार नष्ट करून टाकावयाची होती. शरीर कौरव पक्षाकडे, मने मात्र पांडवांचा जय इच्छिणारी. राजकीय दृष्ट्या ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट होती. पांडवांचा पक्ष न्यायाचा व धर्माचा आहे त्यांचा विजय व्हावा असा न्यूनगंड हाच युद्धातील सर्वात महत्त्वाचा विजय. यातूनच कार्य साधत असते.



२) कौरव पक्षात पांडवांच्या पराक्रमाचा धाक निर्माण करावयाचा होता. कौरवांना आपला पराजयच होणार असे वाटवयास लावणे.

३) कर्णाचा उत्साह संपविणे.

४)कौरव पक्षात योद्ध्यांमध्ये परस्पर बेबनाव निर्माण करणे.

५) कौरव जगाच्या दृष्टीने कसे वध्य आहेत ते पटवून देणे.

अशा अनेक राजकीय हेतूंसाठी श्रीकृष्णाने स्वत: शिष्टाई स्वीकारली. जगासमोर दुर्योधन दुरात्मा व पापी हे सिद्ध करणे माझे कर्तव्य आहे व ते मीच तेथे जाऊन पार पाडणार आहे असे निघताना श्रीकृष्णाने उद्गार काढले.

### कृष्ण शिष्टाई

कार्तिक शुद्ध द्वादशीच्या दिवशी सकाळी रेवती नक्षत्रावर भगवान श्रीकृष्ण युधिष्ठिराचा निरोप घेऊन शिष्टाईसाठी प्रयाण करते झाले. रस्त्यात अनेक शुभशकुन झाले. निघण्यापूर्वी सर्वांचे मत अजमावून घेतले. श्रीकृष्ण अर्जुनाला विचारतो, 'हातात शस्त्र धारण न करता राहणाऱ्या मला कशासाठी तू पत्करलेस?' अर्जुनाने लगेच सांगितले, 'तुझी जगात विख्यात किर्ती आहे. यश तुझ्याकडे येणार ही गोष्ट निश्चित आहे. मला यशाची इच्छा आहे. म्हणून तू नि:शस्त्र असलास तरी मी तुला पत्करले.' अर्जुनाची ही निष्ठा पाहून श्रीकृष्ण मनोमनी आनंदित झाला.

मार्गात अन्न नाकारले - त्या बद्दल दुर्योधनाने

विचारले असता श्रीकृष्ण म्हणतात - तूच काय पण तुझ्या येथील अन्न मी स्वीकारणार नाही. हे दुष्टाचे अन्न आहे व ते पापाने डागाळलेले आहे. या संपूर्ण राज्यात मी ज्याच्या घरी जेवावे, अशा योग्यतेचा फक्त एकटा विदुर आहे, असे दुर्योधनाला ठणकावले. विदुराकडेच रात्र घालविली व दुसऱ्या दिवशी सभेत गेले.

**श्रीकृष्णाचे भाषण**

क्षत्रिय वीरांचा विनाश न होता कौरव व पांडव यांच्यात शांतता नांदावी व संधि व्हावा म्हणून ती मागणी मान्य होण्यासाठी मी स्वत:हून इथे आलो आहे. आपले दायित्व न विसरता - स्वत:चे सामर्थ्य उपयोगात आणून आपत्तीपासून सुटका करून घेणे, राजा सर्वस्वी तुझ्या हातात आहे. लोक कौरवांचा राजा म्हणून तुला ओळखतात. तुझे दुर्योधन व प्रमुख पुत्र धर्म, राजकीय नीतिमत्ता यांच्याकडे पाठ फिरवून नृशंसाप्रमाणे वर्तन करीत आहेत. त्यामुळे तुझ्या कुळावर भयानक आपत्ती येऊन कोसळली आहे. या आपत्तीची उपेक्षा केल्यास जगाचाच विनाश ओढविल्याशिवाय राहणार नाही. हे राजा तू मनात आणशील तर आपत्ती थांबविणे फार दुष्कर नाही.

हे राजा धृतराष्ट्रा, आज शांतता दोन व्यक्तींवर अवलंबून आहे. तू व मी. तू आपल्या पुत्रांना आवर, मी पांडवांना आवरतो. तुझी मुले तुझ्या आज्ञेतच राहिली पाहिजेत. 'त्वयि आधीन: शमो राजन् मयि चैव विशांपते। पुत्रान् स्थापय कौरव्य स्थापयिष्यामि अहंपरान् । म. भारत

तुझे हित व्हावे, पांडवांचे हित व्हावे, अनुशासन नीट चालावे हा प्रयत्न करण्यातील माझा हेतू आहे. तू जर संधि करावयास सिद्ध झालास तर पांडव हेही कुरु कुळातीलच असल्याने तुला साहायक राहतील. राजा धर्म व अर्थ या मर्यादेत तू रहा. पांडव तुझे संरक्षण करतील. त्यांना जिंकणे अशक्य. कौरव व पांडव एकत्र आले तर तू जगाचा एकछत्री सम्राट व अजिंक्य होशील. युद्धासाठी बोलविलेल्या राजे लोकांना सत्कारपूर्वक परत पाठव.

आपसात लढण्यात अपकीर्ती, विनाश, याशिवाय काहीच पदरात पडणार नाही. राजा असा उभयतांचा विनाश घडवून आणण्यात कोणता अर्थ आहे? तूच पांडवांना वाढविलेस. न्यायानुसार त्यांचे पालन करावे हेही तुझेच कर्तव्य आहे. संकटात तूच त्यांचे रक्षण केले पाहिजेस. ते तुला पिता मानतात. दिलेल्या वचनानुसार ते वागले आहेत. तसेच तूही वागावे. धर्ममर्यादा सोडून वागणे हे स्वत:च वडिल समजणाऱ्या व्यक्तीचे कर्तव्य निश्चित नव्हे. प्रथमच श्रीकृष्णांनी युधिष्ठिराला धर्माचा उपदेश करणाऱ्या संजयाच्या शिष्टपणावर म्हणजे पर्यायाने राजा धृतराष्ट्राच्याच धृष्टतेवर जोरकस प्रहार केला.

तू द्रौपदीची विटंबना चालली असताना तू ती आवरू शकला नाहीस. झाले गेले विसरून जा. लोभाच्या तावडीत सापडलेल्या आपल्या पुत्रांना तू आवर, असे स्पष्ट सांगावेसे वाटते. तुझी इच्छा असली तर पांडव तुझी सेवा करण्यास तयार आहेत. युद्ध व शांतता यापैकी तुला जे हवे असेल ते तू पत्कर. शांततेच्या यशाचा वाटेकरी व्हावयाचे का अपयशाचा वाटेकरी व्हावयाचे ते तू पत्कर वा ठरव.

दुर्योधन हा उघड अपहार करणारा व धृतराष्ट्र आड राहून अपहरण करणारा आहे. दोघेही सारखेच पापी आहेत. अंत:करणात लोभ वाढलेला व तो झाकण्यासाठी धर्माची ढाल पुढे उभी करणार राजा धृतराष्ट्र आता वाचू शकणार नाही. जे पांडवांचे ठरलेले आहे, त्याचा अधर्माने अपहार करून वर धर्माच्या गोष्टी धृतराष्ट्राने कितीदा सांगितल्या तरी कोण ऐकून घेईल? कौरवांच्या राज्यामध्ये परत जाऊन तू राजालाच धर्माचा उपदेश कर, असे संजयाला निरोप देतेवेळी श्रीकृष्णानी सांगितले. तू जाऊन सांग की धर्मनिष्ठ पांडव जसे शांततेचे पुरस्कर्ते आहेत तसे ते अद्वितीय आणि समर्थ योद्धेही आहेत ही गोष्ट लक्षात ठेवून पुढचे पाऊल टाका. याची आठवण आपल्या भाषणाने राजाला पुन: करून दिली.

ढोंगी धृतराष्ट्राचे स्वरूप या भाषणात श्रीकृष्णाने उघड

करून त्याला पेचात पकडले. त्याला काही एक उत्तर सुचेना. तो युधिष्ठिराला फसवू पहात होता व सारे उत्तरदायित्व त्याच्यावरच श्रीकृष्णाने टाकल्यामुळे तो गोंधळला. त्याने ते मुलावर ढकलले. धृतराष्ट्राला आपल्याच तोंडाने स्वत:च्या मुलावर दोषारोप करणे भाग पडले. तो म्हणतो - श्रीकृष्णा, तुझे म्हणणे खरे आहे. इह परलोकी सुखाचे, धर्म न्याय यांना सर्वस्वी धरून तुझे बोलणे आहे. मूर्ख दुर्योधन सगळ्या मर्यादेच्या बाहेर गेलेला आहे. मी स्वतंत्र नसून परतंत्र आहे. माझे काही चालत नाही. तुझे जर सामर्थ्य असेल तर तूच त्याला वळविण्याचा प्रयत्न कर. गांधारी, विदुर, भीष्म यांचेही तो ऐकत नाही. हा पाप बुद्धीचा भ्रष्टचित्त आहे. या दुरात्म्याला तू वळवू शकशील तर अत्यंत मोठे कल्याण होईल.

### दुर्योधनाशी बोलणे केले

श्रीकृष्ण म्हणाले, तुझ्या हिताचे जे मला वाटते ते मी तुला सांगावयाचे ठरविले आहे. जगात दोन प्रवृत्ती मुलभूत दिसतात. एक प्रवृत्ती स्वाभाविकपणेच धर्म व अर्थ याना धरून असते तर दुसरी त्याना सोडून असते. पहिल्या प्रवृत्तीला सत् प्रवृत्ती म्हणतात व दुसरीला असत् प्रवृत्ती म्हणतात.

तुझी स्वभावत: असत् प्रवृत्ती आहे. पांडवांशी संधि करणे तुझ्या, जगाच्या, कुरु कुलाच्या दृष्टीने हिताचे व सुखाचे आहे. तुझ्या वडिलांना हा मार्ग हिताचा वाटतो. सर्वांचे मत संधि करण्याकडेच आहे. पित्याने प्रगटपणे जी इच्छा व्यक्त केली तदनुसार वर्तन करण्याने तुझे आपत्तीपासून संरक्षण होईल.

जे आपल्या हिताचे आहे, प्रसंगी स्वत:चे मत बाजूस ठेवून ते आचरणात आणतो त्याचेच शेवटी कल्याण होते. मनाच्या लहरीपेक्षा विचारवंतांचे ऐकणे हितावह ठरते. अन्यथा तो संकटात सापडतो. धर्म, अर्थ, काम या तीन पुरुषार्थांचे अवलंबन करणाऱ्या माणसाचे तीन वर्ग पडतात. धैर्यशाली मनुष्य धर्माचे अवलंबन करतो. सामान्य मनुष्य लाभालाभाचा विचार करतो. मूर्ख मनुष्य लहरीनुसार वागतो. भोग लालसेने प्रेरित होऊन लोभासाठी धर्माला पायाखाली तुडविणारा मनुष्य शेवटी अर्थ, कामही घालवून विनाश पावतो. त्रिवर्गाचे खरे साधन केवळ धर्म होय. केवळ तुझ्या लहरीसाठी या सर्वांचा विनाश करून घेऊ नकोस. कौरव जिवंत रहावेत व त्यांचा सर्वनाश होऊ नये, अशी माझी फार इच्छा आहे. श्रीकृष्णांनी दुर्योधनाला खड्यासारखा वेगळा काढून जगाच्या दृष्टीने त्याला वध्य ठरविण्याचे कार्य या भाषणाने केले. त्याच्या सहकाऱ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण केला. एका व्यक्तीच्या हटवादासाठी अधार्मिक कौरव नाश ओढवून घेत आहेत, असे त्यांच्या सहकाऱ्यांना दर्शन घडविले.

यावर दुर्योधन म्हणतो -

समरांगणाच्या मृत्यूला क्षत्रिय घाबरत नाही. सुईच्या अग्राने उकरली जाईल एवढी माती देखील (भूमी) हक्क म्हणून पांडवांना न देण्याचा आपला कृत निश्चय घोषित केला.

श्रीकृष्ण म्हणतात -

तुला वीर शयन करावयाचे आहे काय? ते तुला निश्चित मिळेल. हे मूर्खा, पांडवांचा मी काहीच अपराध केला नाही हे तू वारंवार सांगतोस. तर तुझे अपराध व अन्याय मी सर्वांनाच सांगू इच्छितो. ते त्या लोकांनीच ठरवावे, तू अपराधी आहेस की नाहीस. पांडवांनी मिळविलेल्या वैभवाने तुझ्या हृदयात मत्सराग्नीने पेट घेतला. ते हरण करण्यासाठी द्यूताचे कपट तू रचलेस. विनाशाचे प्रवेशद्वार तू स्वत:च उघडलेस. आपल्या ज्येष्ठ बंधूच्या पत्नीशी तू ज्या अनार्य पद्धतीने वागलास तसे तुझ्यासारख्या अधमावाचून दुसरे कोण वागू शकेल? हा तुमचा अपराध नव्हे का? अनेकवार असभ्य दुरुत्तरे पांडवांना केलीस, त्यांना ठार मारण्याचे प्रयत्न लहानपणापासूनच केलेस. वारणावतेत

लाक्षागृहात जाळून मारण्याचा प्रयत्न, विष देणे, सर्प बंधनात पाडणे सारे प्रकार त्यांना मारण्यासाठी केलेत. त्यांच्या वडिलांचा हक्काचा राज्यभाग लुबाडण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे? धृतराष्ट्र, भीष्म, द्रोण, विदुर, गांधारी यांनी वारंवार तुला उपदेश केला. कोणाचेही तू ऐकत नाहीस. अधर्म, अपकीर्ती, मरण याशिवाय तुझ्या भाग्यात दुसरे काय असणार? हे ऐकून दुर्योधन निघून गेला.

श्रीकृष्णाने कुरुवृद्धांना पण विचारले - दुर्योधनावर दोष ढकलून काय उपयोग? तुमचे स्वत:चे वर्तन किती चुकीत आहे, याचा विचार केला आहात काय? तुम्ही तुमच्या सामर्थ्याचा उपयोग करून त्या मूर्ख दुर्योधनावर नियंत्रण का घालीत नाही? तो प्रत्यक्ष अपराध करणारा म्हणून जितका दोषी आहे तितकेच तुम्हीही त्याच्या अपराधाकडे केवळ स्वस्थपणे प्रेक्षकाच्या भूमिकेवरून पाहणारे व स्वत:च्या सामर्थ्याचा उपयोग न करणारे म्हणून तितकेच दोषी ठरत नाही काय?

आजच्या परिस्थितीत तुम्ही कठोर वागले पाहिजे. तुमचे कल्याण होईल. तुम्ही आपल्या सामर्थ्यांचा उपयोग करून दु:शासन, कर्ण, शकुनी, दुर्योधन यांना बंदी करून पांडवांच्या स्वाधीन करावे, असे मला वाटते. 'त्यजेत् एकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।' धृतराष्ट्राला उद्देशून कृष्ण म्हणाले - 'दुर्योधन दुरात्मा तुझ्या आज्ञेत नाही म्हणून हा विनाशाचा भाग उद्‌भवत आहे, असे तू जे म्हणतोस ते खरोखरीच अंत:करणपूर्वक म्हणत आहेस काय? मग मी या गोष्टीचा निर्णय करतो. अतिशय सुलभ आहे. दुर्योधनाला बंदी करून पांडवाशी संधि कर. त्यामुळे तुमचे कुळ वाचेल व जगाचाही विनाश थांबेल. तुम्हाला शांततेच्या, सृजनतेच्या घोषणा प्रामाणिकपणे करता येतील.

या सरळ सूचनेने कुरु वृद्धांचा पुराच दंभ स्फोट झाला व ते उघडे पडले. दुर्योधनाचा पापी दृष्टीकोन सात्यकीच्या ध्यानात येताच कडेकोट बंदोबस्त करण्यात आला. हे मूर्ख पापात्मे श्रीकृष्णाला बंदी करू इच्छित आहेत. पण वस्त्राने अग्नी झाकला जाईल काय? ते दग्ध होईल तसे श्रीकृष्णाला बद्ध करणारे हात, शरीर हे सुद्धा दग्ध झाल्याशिवाय रहाणार नाहीत.

वरील श्रीकृष्णाचे वाक्य कुरु कुळात गोंधळ करणारे ठरले. श्रीकृष्णाने शेवटी सांगितले, राजन् तू मला परवानगी दे, या दुष्टांना क्षणार्धात मी बंदी करून टाकतो. त्याने आपले विश्वरूप प्रगट केले. धृतराष्ट्रालाही दिव्यचक्षू देऊन ते रूप दाखविले. उरली सुरली जयाची आशा मंदावून टाकली.

नंतर श्रीकृष्ण सुखरूप बाहेर पडले. निरोप घेताना कुरुवृद्धांना सांगितले. कौरव कुळाचा आजचा स्वामी दुर्योधन आहे. तो असभ्य, क्रूर, मूर्ख, क्रोधी आहे हे तुम्ही पाहिलेच आहे. राजा धृतराष्ट्र स्वत: परतंत्र असल्याचे म्हणत आहे. अशा परिस्थितीत सत्ताधाऱ्याशी कसे वागावयाचे ते आम्ही ठरवू. आता आमच्याकडे दोष नाही. युधिष्ठिराकडे जाण्यासाठी मी तुमचा सर्वांचा निरोप घेतो, असे सांगून श्रीकृष्ण कुंतीकडे गेले. तिला आश्वस्त केले. त्यानंतर पांडवाकडे जाण्यास निघाले.

(क्रमश:)

**शं. वा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

दिशा
नियमित वाचा

# सौळा स्मारके

*भारतातील प्रसिद्ध अशा कलाकृतींचा परिचय सदर लेखमालेतून करून देत आहोत. - संपादक*

आजच्या या लेखात वेरुळ येथील 'कैलास मंदिरा'बरोबरच तेथील इतर उल्लेखनीय शिल्पांचीही माहिती करून घेऊ.

वेरुळ हे गाव जगविख्यात झाले ते गावाच्या पश्चिमेला एक मैलावरील डोंगरात खोदलेल्या लेण्यांमुळे. भारतातील सर्व लेण्यांत ही लेणी उत्कृष्ट मानली जातात. ही लेणी उभ्या पहाडात कोरली नसून डोंगर उतारावर आहेत. हा डोंगर दक्षिणोत्तर पसरलेला असून त्याचा आकार चंद्रकोरीसारखा आहे. या डोंगरात ३४ गुंफा आहेत. दक्षिणेकडील १२बौद्ध, उत्तरेकडील ५ जैन तर मधल्या १७ हिंदूंच्या आहेत. तीन धर्मांच्या निरोगी स्पर्धेचे हे केंद्र. बौद्ध लेणी इ.स. ५५० ते ८०० या कालखंडातील असून ती महायान पंथाची आहेत. त्यात एकच चैत्यगृह असून बाकीची बुद्धप्रतिमायुक्त विहारगृहे आहेत. इ. स. ६५० नंतर हिंदू गुंफांची निर्मिती सुरु झाली. त्यातील 'कैलास मंदिर' हे अत्यंत सुंदर लेणे.

**कैलास मंदिर**- पल्लव राजांच्या आमदानीत निर्माण झालेल्या द्राविड मंदिराशी अत्यंत घनिष्ट साम्य असलेले महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचे मंदिर म्हणजे वेरुळ येथील कैलास मंदिर. राष्ट्रकुट वंशातील पहिला कृष्णदेवराय (इ. स. ७५७-७८३) याने हे शैवमंदिर उभारले. मध्य भारतात चालुक्य वंशानंतर राष्ट्रकुटांनी आपली सत्ता प्रस्थापित केली व ती ८ व्या शतकापर्यंत सुस्थिर होती. कैलास मंदिर हे बांधीव स्वरुपाचे देवालय नव्हे, एक भला मोठा एकसंध प्रस्तर कोरून त्याला मंदिर स्थापत्याचे रूप आणलेले आहे. डोंगरातील एका प्रचंड खडकावर कोरीव काम करून मुख्य मंदिर, त्याचे सभामंडप, स्तंभयुक्त नंदीमंडप, अलंकृत भव्य द्वारमंडप हे सर्व भाग बनवण्यात आले आहेत. एवढ्या प्रचंड प्रमाणावरील हे कोरीव काम करण्यास लागणारा काळ, श्रम आणि पैसा याविषयी कल्पनाच केलेली बरी. मंदिरातील व बाहेरचे सुटे स्तंभ, समोरील हत्तींची शिल्पे इत्यादींसाठी आवश्यक असणारा सर्व भाग कायम ठेवून बाकी दगड फोडला जाणे आवश्यक होते. पूर्व नियोजनाशिवाय हे शक्य नाही. मंदिराच्या मुख्य इमारतींना व सभोवतालच्या लहान सहान मंदिरांना जोडणारे पुलासारखे मार्ग पहिल्यापासून शाबूत ठेवणे आवश्यक होते. या पद्धतीचा एक दोष म्हणजे संपूर्ण मंदिर अत्यंत भव्य असूनही एका खोल खड्ड्यात असल्यामुळे बाहेरून व लांबून त्याचे ऐश्वर्य लक्षात येत नाही. यावर उपाय म्हणून तेथील वास्तुविशारदांनी त्याच्या पायाचा चबुतरा खूप उंचीचा ठेवला आहे. हे शैवमंदिर असून गर्भगृहात एक भव्य शिवलिंग आहे. शिवाचे निवासस्थान असलेल्या कैलास पर्वताची ही प्रतिकृती निर्मिण्याचा हेतू त्याच्या नावावरून स्पष्ट होतो. एका बाजूने दिसणारे या मंदिराच्या शिखरांचे एकूण दृश्य थोडेबहुत हिमालयातील कैलास पर्वतासारखेच दिसते, असे सांगितले जाते. महाबळिपुरमच्या धर्मराज रथाप्रमाणेच येथील शिखर अनेक मजल्यांचे भूमियुक्त



कैलास मंदिर, वेरुळ

आहे. प्रत्येक मजल्यावर कूट, शाला, स्तूपिका इत्यादी द्राविड वास्तूची लक्षणे दिसून येतात.



वर म्हटल्याप्रमाणे या मंदिराची बांधणी उंच चौथऱ्यावर केली आहे. या चौथऱ्याचीच उंची ७.५० मी. आहे. कैलास मंदिरात गर्भगृहाच्या अलीकडे एक विस्तृत सभामंडप आहे. सभामंडपाच्या दोन्ही बाजूस पूर्व व पश्चिमेकडे अंगणाच्या पलीकडे स्तंभयुक्त मंडप आहेत. द्वारमंडपाच्या पुढे सरळ ओळीत नंदीकरिता स्वतंत्र मंडप आहे. गर्भगृहाच्या सभोवार पाच लहान मंदिरे प्रदक्षिणा मार्गाच्या कडेला आहेत. या सर्व वास्तूंच्या बाह्य भागावरील अलंकरण म्हणजे भिंतीवरील खोल कोनाड्यात कोरलेल्या देवदेवतांच्या मूर्ती व द्राविड शैलीचे स्तंभ होय. या कोनाड्याच्या दोन्ही बाजूस नाजूक स्तंभ व त्यावर लहानशी कंगणी आहे. कंगणीवर चैत्य कमानीचा आकार कोरलेला आहे. ही सर्व रचना पूर्णपणे द्राविड आहे व मामल्लपूरम (महाबळीपूरम)च्या आदर्शावरच उभारलेली आहे.

कैलासमंदिराच्या खालील चवुतऱ्यावर कोरलेली उंच उठावाची शिल्पपट्टी विशेष प्रेक्षणीय आहे. त्यात सिंह व हत्ती यांच्या आकृत्या कोरलेल्या आहेत. वरील भव्य रचना त्यांनी आपल्या पाठीवर जणू सहजपणे तोलून धरली आहे, असे दिसते. शिल्पाचे कोरीव काम केवळ मुख्य मंदिरावरच आहे असे नव्हे तर नद्यांची व देवदेवतांची दुय्यम महत्त्वाची देवळेही त्याचप्रकारे अलंकृत केलेली आहेत.

कैलास मंदिराचे प्रवेशद्वार गोपुरासारखे भव्य असून त्याच्या भिंतीवरही गोवर्धनोद्धार, दिक्पाल इ. शिल्पे कोरली आहेत. प्रांगणात प्रवेश करताच समोर गजलक्ष्मीची सुंदर मूर्ती दिसते. एका सरोवरातील कमळावर लक्ष्मी बसलेली असून बाजूला हत्ती, वर गंधर्व आणि छत्र आणि दोन्ही बाजूंना अर्धस्तंभ व द्वारपाल आहेत. लक्ष्मीसमोरील प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीत गणपती, महिषासुर मर्दिनी यांची शिल्पे आहेत.

महिषासुर मर्दिनीच्या शिल्पात नाट्यमय प्रसंग कोरण्यात आला आहे. महिषासुर मर्दिनीच्या आठही हातात निरनिराळी शस्त्रे आहेत आणि त्या शस्त्रांनिशी राक्षसावर चाल करून येत आहे. तिच्या हातांची हालचाल अशी दाखवली आहे की, तिच्या मस्तकाभोवती त्याची प्रभावळ वाटावी. दुर्गेने बैलसदृश राक्षसावर हल्ला केला आहे, त्याचवेळेस तिचे वाहन सिंह आणि तिच्या शक्ती याही त्या राक्षसावर तुटून पडल्या आहेत. दुर्गेने एकाच वेळेला तीन बाण राक्षसावर सोडले आहेत. राक्षसाला सगळ्या बाजूने घेरले आहे. ही लढाई बघण्यासाठी आकाशात देव जमा झाले आहेत.

मंदिराच्या प्रांगणात दोन्ही बाजूंना दोन दगडी हत्ती दिसतात. गजलक्ष्मीच्या मागे नंदीमंडप आहे. नंदीमंडपाच्या दोन्ही बाजूंना दोन उंच ध्वजस्तंभ आहेत. त्या स्तंभांवर शिवाचे त्रिशूळ होते. ते धरून स्तंभांची उंची सुमारे ५० फूट होती. नंदीमंडपाच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर मधे नटराज शिवाची मूर्ती व त्याच्या दोन्ही बाजूंना हरीहर व अर्धनारीश्वर यांची शिल्पे आहेत. नंदीमंडप व चौथरा यांच्यामध्ये समोरासमोर दोन उत्कृष्ट शिल्पपट आहेत. नंदीमंडपाच्या भिंतीवर अंधकासुर वधाचा प्रसंग असून समोरच्या भिंतीवर महायोगी शिवाची मूर्ती आहे. त्या मूर्तीच्या बाजूस वरुण, वायू, इंद्र, यम, कुबेर, अग्नी इ.च्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. नंदीमंडपाच्या उजवीकडील

पायऱ्या चढून वर जाताना बाजूच्या भिंतीवर एक शिल्पपट आहे. सर्वांत नाट्यपूर्ण व प्रभावी असे हे शिल्प आहे. एका खोलवर खोदलेल्या रंगमंचासारख्या चौकटीत कैलासपर्वताची ठोकळेवाज प्रतिमा दाखवली आहे. पर्वताच्या शिखरावर शिव व पार्वती बसलेली आहेत. त्या पर्वताच्या खालील भागात रावण आपल्या अनेक हातांनी पर्वत उपटून काढण्याच्या प्रयत्नात असलेला दाखवला आहे. वर शिवाची आकृती अगदी सहजपणे बसलेली कोरली आहे व ती आपल्या पायाने पर्वत खाली दाबून रावणाला पर्वताच्या खाली दडपून टाकीत आहे, असे दृश्य आहे. पर्वताच्या कंपामुळे भयभीत झालेली पार्वती शंकराच्या बाहूला बिलगली आहे. एक दासी मागील अंधारात अगदी भयभीत होत पळून जात असलेली दिसते. खालील गुहेत रावण अडकला आहे. प्रत्येक आकृतीत कलाकाराने जो भाव व्यक्त केला आहे त्याला अनुसरूनच खोली व अंधार यांचा उचित उपयोग केलेला आहे. एखाद्या रंगमंचावर हे नाट्य चालू आहे, असा भास होतो. कलाकाराच्या उत्तुंग प्रतिभेचा सर्वोत्कृष्ट आविष्कार या उत्थित शिल्पातील नाट्यपूर्ण भाव दर्शनात आढळतो. शिव व पार्वती यांची प्रमाणबद्ध शरीरे महाबळीपुरमच्या देवादिकांच्या मूर्तींप्रमाणे आहेत. चेहऱ्यावरील फेरफारातून भावदर्शन घडविण्याऐवजी शारीरिक स्थिती व अविर्भाव यांच्याद्वारे ते साध्य केले आहे. हे या शिल्पाचे खास वैशिष्ट्य.

असाच नाट्यमय प्रसंग रावण जटायू यांच्या युद्धातही दिसतो. रावण सीतेला आपल्या रथातून पळवून नेत असता जटायू त्याच्यावर हल्ला करतो. या शिल्पातील सीतेच्या शिल्पाची मोडतोड झाली आहे. रावणाची आकृती उच्च उठावात कोरली आहे. जटायू त्याच्या मांडीला चावण्याचा प्रयत्न करीत आहे आणि रावण त्याला आपल्या अस्त्राने मारू पहात आहे. यातील हालचालीतील लय वाखाणण्यासारखी आहे.

कैलास मंदिरातील इतर उल्लेखनीय शिल्पे म्हणजे गंगावतरण, त्रिपुरांतक शिव व गरुडवाहन विष्णू ही होत. वेरूळच्या काही गुहांतून भित्तिचित्रांचे थोडे अवशेषही आढळतात. त्यातील प्राचीन चित्रे अजंठा शैलीशी जुळती आहेत. पण नंतरची चित्रे मात्र तितकीशी प्रभावी नाहीत. चेहरे व त्यातील अवयवांचे काटेकोर व प्रभावी चित्रण मध्ययुगीन शैलीचे निदर्शक आहे.

संकलक - सौ. मंजिरी दांडेकर (कलाशिक्षिका)
डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा.वि.)

संदर्भ : विश्वकोश
संस्कृतीकोश
History of fine arts in India & West
भारतीय कलेचा इतिहास
AJANTA & ELLORA

# सुभाषित

कुलीनै:सह संपर्कं पंडितै:सह मित्रताम् ।
ज्ञातिभिश्च समं मेलं कुर्वाणो न विनश्यति ॥

*कुलशीलवानांच्या सहवासात रहावे. विद्वानांबरोबरच मैत्री करावी. आपल्या जातिबांधवांमध्ये (आप्तेष्टांमध्ये) मिळून मिसळून रहावे. याप्रमाणे वागणाऱ्याचे नुकसान कधीही होत नाही.*

# डॉ. मो. दि. पराडकर यांचे आत्मकथन

भाग - २

एम्. ए. ला पहिला वर्ग मिळाला हे खरं, परंतु मी एकटाच रहात असल्याकारणानं तावडतोव नोकरी मिळवण्याची आवश्यकता होती. याची सुरुवात मी बी.ए. ला असल्यापासूनच झाली. १९४५ साली जेव्हा बी.ए. झालो त्यावेळेला मला गिरगावच्या 'कमलाबाई कन्याशाळा' येथे माझे एक मित्र वर्वे यांच्या ओळखीमुळे शिक्षक म्हणून नेमलं होतं. तिथल्या विद्यार्थिनींनीही माझ्यावर प्रेम केले, माझा अभिमान बाळगला. ४७ साली एम्. ए. झाल्यावर माझ्या एका वर्गमित्राच्या वहिणीच्या ओळखीने रेशनिंगमध्ये अधिकारी म्हणून नेमणूक होण्याचीही संधीही मला होती. पण मी त्यांना सांगितलं की माझा विषय संस्कृत. त्याचा मला काहीच उपयोग तिकडे होणार नाही. तेव्हा मी काही या बाबतीत फारसा उत्सुक नाही. त्यांनीही माझी एकूण मन:प्रवृत्ती ओळखून याच्याबद्दल आग्रह असा धरला नाही.

पण मुलांप्रमाणंच माझ्या शिक्षकांचाही माझ्यावर लोभ होता. रुईयामधले माझे गुरु र. रा. देशपांडे आणि त्यांचे सहकारी त्र्यं. कृ. टोपे. ४७ च्या जूनमध्ये टोपे यांचं लॉ कॉलेजमध्ये जाण्याचे ठरले. त्यांनीच मला सांगितलं की दुसरीकडे कुठे नोकरी स्वीकारण्यापूर्वी तुम्ही थांबा. मी गेलो तर माझ्या जागी तुम्ही येणार हे जवळजवळ ठरलेलंच आहे. मी म्हटलं ठीक आहे. जुलै उजाडल्यावर एक दिवस मी रुईयामध्ये गेलो असता त्यावेळचे प्राचार्य आणि जीवशास्त्र विभागाचे अध्यक्ष डॉ. मूर्ती यांनी मला ऑफिसमध्ये भेटूनच सांगितलं, 'तुम्ही उद्यापासून लेक्चरर म्हणून शिकवायला यायचं.' हे बोलताबोलताच त्यांनी आपल्या हेडक्लार्कना बोलावून माझ्या हाती नियुक्तीचं पत्र दिलं. इतक्या सहजपणानं पूर्वी या गोष्टी होत असत!

१९४५ मध्ये बी. ए. ला पहिल्या वर्गात प्रथम आल्यामुळे माझ्या गुरुंनी माझी फेलो म्हणून नियुक्ती केली होती. फेलोला त्यावेळी शिकवायला सांगत असत. एक पूर्वतयारी म्हणून. पण बी.ए.च्या २५-३० विद्यार्थ्यांच्या वर्गाला शिकवणं निराळं आणि त्यावेळच्या १५० विद्यार्थी असलेल्या विद्यार्थ्यांपुढे इंग्रजीतून संस्कृत विषय मांडणं निराळं !!

फस्ट इयरचा माझा पहिल्या दोन वर्षांचा अनुभव असं सांगतो की, विषयाच्या ज्ञानापेक्षा आणि विषय शिकवण्याच्या तळमळीपेक्षा १५० विद्यार्थ्यांना ४५ मिनिटे आपल्या ताब्यात ठेवणं यालाच महत्त्व येत असे ! माझ्या एका शिक्षकाने मला असं सांगितलं होतं की Treat your First Year or Inter Students as enemies ते तुमची नेहमी टिंगलच करणार हे गृहीत धरून तुम्ही त्यांना सतत धारेवर धरण्याचा उपाय शोधून काढा! अर्थात् हा उपाय ज्याचा त्यानेच वर्गामध्ये शोधून काढायचा असतो. त्यामुळे पहिल्या दोन वर्षामध्ये मला हे सगळे अनुभव आले. वर्गामध्ये विद्यार्थी आरत्या म्हणतात, आपण एखादं वाक्य बोललो की त्याच्या अनुषंगाने इतर काही वाक्ये मोठ्याने बोलणे असे साधारणपणे विचकवण्याचे प्रयत्न (अननुभवी शिक्षक असेल तर) करणारे विद्यार्थी त्या काळातही होते. पण दोन वर्षांनी मीही रुळलो. त्यानंतर कधी मला वर्गात मुलांवर नियंत्रण ठेवण्याची जरुरी भासली नाही. मी वर्गात गेल्यावर आपोआपच ते निर्माण होऊ लागले. हेही खरंच, की विद्यार्थी नेहमीच शिक्षकाची पातळी ओळखतात. विषयाची तयारी शिक्षकाने किती केली आहे हे विद्यार्थ्यांना कळायला वेळ लागत असेल; पण कळल्यावाचून रहात नाही. त्यामुळे १९४९ पासून माझा जम बसायला लागला. माझा जम बसायला लागला हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे की प्राचार्यांची आणि माझी फारशी जवळीक निर्माण होऊ शकली नाही. दोन वर्षांनी आमच्या व्यवसायात माणूस कायम होत असे. त्यामुळे ४९ साली मला कायम नेमणूक

मिळेलच अशी खात्री मला वाटत नव्हती. ४८ साली माझं लग्न झालं होतं. त्यामुळे जबाबदारी वाढलेली होती. मुंबईत जागा जरी नसली तरी ती घेणं आता आवश्यक होऊन बसलं होतं आणि त्यासाठी प्रयत्नही चालू होते. कायम होण्याच्याबाबतीत मला जरी खात्री नसली तरी माझे मामा हस्तसामुद्रिक आणि ज्योतिष या विषयातले तज्ज्ञ श्री. लक्ष्मण केशव उर्फ नाना तांबे यांना मात्र यासंबंधाने खात्री होती. ते म्हणाले, 'तुम्हाला कायम लोकांमध्ये नक्की स्थान आहे. मला या बाबतीत शंका वाटत नाही.' डॉ. मूर्तींनी खरंच तसा शेरा माझ्या नावापुढे मारला होता !

१९४९ पासून पुढे मी स्थिरावू लागले आणि पुढेपुढे तर विद्यार्थी मला घाबरूही लागले. वर्गात टाचणी पडली तरी आवाज यावा, अशी शांतता दिसून येऊ लागली. त्यामुळे माझा माझ्या सहकाऱ्यांमध्ये सुद्धा एकंदर दबदबा वाढला. यशस्वी शिक्षक म्हणून मी गणला जाऊ लागलो.

मला आता आठवताना मोठी गंमत वाटते. एकदा प्रथम वर्षाच्या वर्गामध्ये मी शिरत होतो आणि एका मुलीच्या केसातलं फूल खाली पडलं. मी सहज भावाने ते उचललं आणि ते तिला देत म्हणालो, 'मी बोलत असताना ते फूल उचलण्यासाठी आपण वाकावं आणि माझ्या बोलण्याकडे आपलं दुर्लक्ष व्हावं, अशी परिस्थिती येऊ नये, म्हणून मी आत्ताच हे केलं !' योगायोगानं या गोष्टीचा सगळ्यांनी इतका धसका घेतला की अहो, फूल पडलेलंसुद्धा यांना चालत नाही ! एकंदर हा मनुष्य खवीसच दिसतोय ! पराडकर म्हणजे Terror, ही प्रतिमा निर्माण झाली. याला वर्गामध्ये एकमेकाशी बोललेलंही चालत नाही. म्हणजे मुलं जर बोलताना दिसली तर मी थांबत असे आणि मी त्यांना सांगत असे की तुमचं बोलणं होऊ द्या. नंतर मी सुरुवात करीन. कारण मी वाङ्मय शिकवतो आणि वाङ्मयाला तशी गडबड नसते ! कालिदासाला वेळ आहे नि मलाही वेळ आहे ! या सगळ्याचा संमिलित परिणाम मात्र असा होता की एकंदरीत माझ्या वर्गात नियंत्रणाचा भाग हा निराळा राहिलाच नाही ! विद्यार्थी ऐकू लागले आणि ऐकल्यामुळे मी काही शिकवतो ते आवडायला लागलं असं म्हणू या. ते आवडायला लागल्यामुळे माझ्या वर्गात विद्यार्थी गैरहजर राहिनासे झाले!

मी त्यावेळेस ठाण्यात रहात होतो. त्यामुळे सकाळी ६.१५ ची गाडी गाठून ७॥ च्या वर्गाला हजर रहायचो. साधारणपणे पहिला वर्ग माझा असे. पण आमच्या महाविद्यालयाची कै. गुरुवर्य देशपांड्यांनी घालून दिलेली परंपरा अशी होती की दिलेला पाठ्यक्रम पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त तास घ्यायचे. त्याला हल्ली Extra-Period म्हणतात. आमचा संस्कृत विभाग तर यासाठी कुप्रसिद्धच होता !! म्हणून आम्ही इंटरच्या मुलांना रविवारी बोलवायला सुरुवात केली. कुंटे म्हणून माझे सहकारी मित्र त्यावेळी ठाण्याला रहात असत. ते एका तुकडीला अर्थशास्त्र शिकवीत, तर मी दुसऱ्या वर्गाला संस्कृत. पण मला आजसुद्धा नवल वाटतं की आमच्या या अतिरिक्त तासांना भयंकर गर्दी असे. वर्गामध्ये तीन-चारशे मुलं सहज असत. इंटरच्या वर्गात रविवारी सकाळी नऊ वाजता अशी गर्दी असे, हे आता सांगूनही खरं वाटणार नाही ! त्यावेळेला रुईयामध्ये ठाणा-कल्याणहून येणारी मुलं असत. माझा तास तर '9 onwards...' असाच असे. नऊनंतर किती काळ लेक्चर चालू ठेवायचं हे विद्यार्थ्यांच्या प्रतिसादावर अवलंबून मी ठेवायचो आणि हा प्रतिसाद मला रुईयामध्ये फार चांगला मिळाला. एकदा तर मी ११ वाजल्यावर असं विचारलं की आता 'थांबू का' तेव्हा विद्यार्थी म्हणाले की, 'आम्ही म्हणत नाही तुम्ही थांबा; तुम्ही बघा. कारण तुम्हाला गाडी गाठायची असते! आम्ही कंटाळलेलो नाही. आम्हाला आनंद वाटतोय !' असं माझं व्याख्यान सव्वा अकरापर्यंत निश्चित चाले आणि मग मी धावत-पळत ११.२८ ची गाडी गाठायचो.

हळुहळु रुईयाच्या साहित्य मंडळाची जबाबदारी माझे गुरुवर्य देशपांडे यांनी माझ्यावर सोपवली. आम्ही त्यावेळेला बरेच प्रयोग केले. प्रत्येक तुकडीने त्यांना नेमून

दिलेला नाटकाचा अंक नाट्यात्मक पद्धतीने वाचायचा म्हणजे नाट्यवाचनाच्या स्पर्धा हा त्याप्रकारचा एक प्रयोग त्याकाळी आम्ही केला. नंतर आम्ही दुसरी एक कल्पना सुरु केली. आज ज्याला अंत्याक्षरी म्हणतात, त्या भेंड्या लावण्याच्या स्पर्धा घेतल्या. त्यासाठी संस्कृतचा एक गट आणि मराठीचा एक गट अशी रचना केली. आम्हाला पहिल्यांदा खात्री नव्हती की आमची ही कल्पना किती यशस्वी होईल. एक वर्ष संस्कृतच्या गटामध्ये आजचे प्रसिद्ध नाटककार रत्नाकर मतकरी यांची पत्नी प्रतिभा ही प्रमुख होती. अक्षरं देण्याच्या पद्धतीवर त्यावर्षी संस्कृतच्या गटाने विजय मिळवला. त्यावेळेला प्रथम वर्षाला 'स्वप्नवासवदत्त' नेमलेलं होतं आणि प्रतिभा प्रथम वर्षाला होती. पण आवडीमुळे या प्रतिभा मनोहरचं पाठांतर इतकं चांगलं होतं म्हणून सांगू! या स्पर्धेत संस्कृत गट जिंकला त्याचं नेतृत्व तिने केले होते!

आश्चर्याची गोष्ट अशी की त्याच्या पुढल्याच वर्षी आम्हाला संस्कृत घेणाऱ्या गुजराती विद्यार्थ्यांनी असं विचारलं की तुम्ही आम्हाला का वगळता, तुम्ही आता गुजरातीचा गट पाडा! आम्ही म्हटलं ठीक आहे. आजच्या अंत्याक्षरी स्पर्धा पाहताना मला ते दिवस आठवतात.

या सगळ्याचा परिणाम झाला की एकंदरच संस्कृत बद्दलची आस्था वाढली. आणखी एक प्रयोग आम्ही केला. एखादा विषय द्यायचा, आता 'शांकुतलातला निसर्ग' हा उदाहरणादाखल सांगता येईल आणि मराठीत, हिंदीत किंवा गुजरातीत विद्यार्थ्यांनी निबंध लिहायचा किंवा बोलायचं. इंग्रजी माध्यमातून संस्कृत शिकावे लागत असल्याने आमच्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमी होई. तो वाढवणे हाही आमच्या या उपक्रमांमागचा एक हेतू होता. आम्हाला आमच्या वार्षिकांसाठी त्यातून लेखही मिळायचे आणि विद्यार्थ्यांचे प्रेमही!

नंतरच्या काळामध्ये ब्राह्मण सभेमध्ये जी संस्कृत नाटके सादर झाली, त्या नाटकांना आमच्या रुईयाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय मदत केली. शाकुंतलातल्या दुष्यंताची भूमिका करणारे नंदा पातकर हे रुईया कॉलेजचे! ते आज नाहीत, अपघाताने त्यांचा अंत झाला याबद्दल खंत वाटते.

एकदा मला आठवतंय, एका मुलीने शाकुंतलावर आधारित एक फार चांगला निबंध लिहिला होता पण तिचे अक्षर फारच दिव्य होतं. अनुमानाने मी तो जाणून घेतला आणि दुसऱ्या एका विद्यार्थिनीकडून त्या निबंधाची चांगल्या अक्षरात नक्कल करून घेतली. तिला मी सांगितलं नाही पण गुरुवर्य देशपांड्यांची मुलगी हेमा हिने तिला ते सांगितले. तिच्या त्या निबंधाला स्पर्धेत पहिलं बक्षिस मिळालं. तिला त्याचं खूप वाटलं. पण मी एवढंच म्हणालो की, विद्यार्थ्यांसाठी मी असं करतोच आणि हे न सांगता करायचं असतं!! त्यामुळे एक झालं, तिचे माझे संबंध आजही घरोब्याचेच आहेत. ही विद्यार्थिनी म्हणजेच आजची विख्यात लेखिका सौ. गिरिजा कीर (पूर्वाश्रमीची रमा मुदवेडकर). असे संबंध जपण्यासाठी फार त्रास घ्यावा लागत नाही. फक्त मुळातच विद्यार्थ्यांविषयी तुम्हाला प्रेम असायला हवं!

या सर्वांमुळे रुईयाचं संस्कृत मंडळ आणि मी यांच्यात अभेद्य नातं निर्माण झालं होतं.

दुसरी गोष्ट अशी निरनिराळ्या भाषिक विद्यार्थ्यांचं माझ्यावर असलेलं प्रेम ही गोष्ट मला नेहमीच आश्चर्यचकित करत आली आहे. सुखावत आली आहे. कॉलेज सुटल्यावर रस्त्यावरून जाताना मी गुजराती विद्यार्थ्यांशी माझ्या मोडक्यातोडक्या गुजरातीत संवाद साधत असे. दाक्षिणात्य विद्यार्थ्यांशीही मी इंग्रजीतून बोलत असे हे खरं पण आपुलकीने बोलत असे. (अर्थात् ही आपुलकी किंवा प्रेम माझ्या मनात होतंच.) आजही ते भेटले की तेवढ्याच प्रेमाने आम्ही बोलतो. हा सारा योग आहे असं मी समजतो.

मराठी विभागप्रमुख त्यावेळेला न.र.फाटक होते. मराठी विभागात त्यावेळी द.के. केळकरही होते.

'काव्यालोचन' या गाजलेल्या पुस्तकाचे ते लेखक. संस्कृतचे आमच्याकडे र.रा. देशपांडे होते. अर्थशास्त्राला गोवर्धन पारीख होते. इतिहासाला वसंत दीनानाथ राव होते. तत्वज्ञानाचे अध्यक्ष होते नारायण विष्णु जोशी. या ना. वि. जोश्यांनी Metaphysics of Individulation असा थिसिस लिहून पी.एच्.डी. मिळवली. ते माळव्याचे होते. त्यांची हिंदीची तयारी उत्तम होती. हिंदीत त्यांनी एक महाकाव्य लिहिलं होतं. त्याचं मी हिंदीत केलेलं रसग्रहण त्यांना आवडलं होतं. ते स्वत: संगीत उत्तम जाणत असत. आम्हाला नंतर असं कळलं की त्यांनी नृत्याचासुद्धा एक डिप्लोमा मिळवला होता. त्यांच्याकडे बघून कुणाला त्यांच्या हुशारीची कल्पना आली नसती. पण असे एकेक मोठे लोक त्यावेळेला आमच्याकडे होते. या लोकांची निरनिराळ्या विषयांत गती होती. कालिदासाने एके ठिकाणी असं म्हटलंय की 'न हि धीमतां कश्चिद् अविषय:' बुद्धिमान माणसाला कुठलाही विषयाचं सहज आकलन होतं. नवी योजना भारतासाठी तयार करण्याचं काम करणारे मानवेन्द्रनाथ रॉय त्यांचे सहकारी म्हणून गोवर्धन पारिखांनी काम केलं होतं. आमचे फाटक म्हणजे तर कुठला विषय त्यांना अगम्य हे कळणंच शक्य नसे. ते नेहमी वर्गात भूमिका अशी घेत असत जो सामान्यपणे मान्य आहे, त्याच्याविरुद्ध भूमिका घेऊन तीच कशी योग्य, हे पटवून द्यायचे. ते साधारणपणे अशा पद्धतीने सांगत असत की त्याचा प्रतिवाद करण्यासाठीसुद्धा तयारी पाहिजे. तेव्हा रुईयामधले माझे अध्यापनाचे १२ वर्षांचे दिवस हे मोठे सोनेरी दिवस होते. कारण या सगळ्या लोकांच्या सहवासात आम्हाला अनेक गोष्टींचे ज्ञान सहज जाताजाता मिळत असे. त्यामुळे आमच्या महाविद्यालयातल्या चर्चांना विशिष्ट स्तर होता. चर्चांचे विषय कुठले असत ? तर 'तत्वज्ञानाच्या क्षेत्रात आज सगळ्यात चांगलं नाव कुणाचं? आणि का?'... मला सहज आठवतंय की त्यावेळी राधाकृष्णन यांचे Indian Philosophy Vol. 1 प्रकाशित झाले होते. मी सहज बोलता बोलत म्हटलं, 'याच्यामध्ये, सहज म्हणून त्यांनी संस्कृत वाङ्मयाविषयी जी विधानं केलेली आहेत ती विधानं इंग्रजीच्या दृष्टीनं जरी चांगली असली तरी संस्कृतच्या दृष्टीनं फारशी ग्राह्य नाहीत.' अर्थात् पुराव्याशिवाय आम्ही असं बोलत नसू. आमचे ना.वि. जोशी म्हणाले, 'अहो पराडकर, तुम्ही त्यांना संस्कृत कमी येतं असं सुचवता; आमचं म्हणणं असं आहे की त्यांना तत्वज्ञान जरा कमी येतं म्हणजे त्यांची अडचणच आहे.' मी म्हणालो, तशी नाही. कारण त्यांचं इंग्रजी सफाईदार असतं. श्रोत्यांवर छाप पाडणारं !

अशीच एक आठवण आहे. झेवियर कॉलेजमधले तत्वज्ञानाचे पंडित असलेले प्राध्यापक लवंदे यांनी एक लेख लिहिला होता - 'शंकराचार्य ए व्हाइनिंग स्कूलबॉय' आणि All Philosophy is under the dead weight of Upanishads असा त्यांनी आमच्या कॉमनरूममध्ये येऊन सकाळच्या प्रहरी चर्चेला विषय आणला. फाटक होते, जोशी होते, पंडित म्हणून तत्वज्ञानाचेच एक प्राध्यापक होते. शिवाय पारिखांचं तत्वज्ञानातलं वाचन अतिशय उत्तम होतं. फाटकांनी सांगितलं, 'तुम्ही तयारी करून या. म्हणजे आपण चर्चा करू. कारण माझी आत्ता तयारी आहे. प्लेटो आणि गीता यांच्या एकंदर तत्वज्ञानाची तुलना आपण करू. तुम्हाला गीता माहिती नसणार. त्यामुळे तुम्ही गीतेची तयारी करून या. जर बोललो तर मी तुम्हाला निश्चित सांगतो मी तुम्हाला गरगरायला लावीन. गीता ठासून जे काही शाश्वत सांगते ते प्लेटोलाही त्या प्रमाणात सांगता आलेलं नाहीये; असं आम्ही सिद्ध करून देऊ.' शंकराचार्यांना 'व्हाइनिंग स्कूलबॉय' म्हटलेलं आमच्या या तत्वज्ञ प्रोफेसरांना फार खटकलं. ना. वि. जोशी म्हणाले, 'अहो, शंकराचार्यांवर चर्चा करण्यासाठी तुम्हाला संस्कृत यायला हवं. तुम्ही अनुवादाच्या पद्धतीने Dead weight of Upanishads म्हणता; तुम्हाला उपनिषद म्हणजे काय वाटतं? त्याच्याही पलीकडे जाऊन आमचे प्रा. पंडित म्हणाले, 'Of all the persons, Dr. Lawande, where is the necessity of convincing you?' 'कारण तुम्ही ज्या

शाळेत/महाविद्यालयात शिकलात त्या संस्थांच्या प्राचार्यांचं सर्टिफिकेट घेऊन या, की तुम्हाला संस्कृत समजतं ! त्यांचं सर्टिफिकेट असलं तर चर्चा करायची का, याचा विचार करु !!' लवंदे बिचारे घाबरले आणि म्हणू लागले, 'हे तुम्ही असं काहीतरी व्यक्तिगत बोलता...' पंडित म्हणाले, 'हे व्यक्तिगत नाही. शंकराचार्यांवर बोलायला संस्कृतची तयारी आवश्यक आहे. अनुवादातून त्यांना काय म्हणायचंय हे संपूर्णपणे कळणं शक्य नाही ! तेव्हा ती तयारी तुम्ही करून या.' खरं सांगतो, आमच्या कॉमनरूममध्ये यायला मोठमोठे लोक घाबरत असत. कारण व्याख्यानाला बोलावल्यावर त्यांना यावे तर लागे, पण विषय कुठला मांडायचा हा त्यांना प्रश्नच पडे ! जो विषय या प्राध्यापक मंडळींच्या आवाक्यात नाही, असा विषय तरी कुठला आणि तो मांडावा तरी कसा असा विचाऱ्यांना पेच पडे !

इंग्रजीचे विख्यात प्राध्यापक सट्टेगिरी आमच्याकडे एकदा व्याख्यानला आले. S.P. चे लोकप्रिय प्राध्यापक ते. त्यांनी व्याख्यान दिलं आणि समारोप करताना आमचे वि.ह. कुलकर्णी म्हणाले, 'Dr. Sattegiri has given you to know how it is necessary to read his guides before understanding English!' सगळं संपलंच मुळी !

चिंतामणराव कोल्हटकर हे प्रसिद्ध नट आमच्या कॉमनरूममध्ये येऊन फाटकांशी चर्चा करीत असत. नाटक कसं बसवायचं यावर !

एकदा इंग्रजीच्या आमच्या प्राध्यापकांना फाटकांनी सांगितलं, 'अहो, तुम्ही 'shakespeare's woman यावर बोलत होता. यावरची माझ्या जवळील पुस्तकं पहा. ती या ग्रंथालयातच आहेत ती वाचून या.

म्हणजे शेक्सपिअरची स्त्रीबद्दलची संकल्पना काय, हे समजण्यासाठी हे सगळं वाचलेलं असलं पाहिजे.

चहा पितापिता सहज फाटक आम्हाला तराण्याची तान म्हणून दाखवायचे. फाटकांना संगीत येतं हे आम्हीच म्हणू शकतो कारण त्यांनी सहज घेतलेल्या तराण्याच्या तानेने आमच्या अंगावर रोमांच उभे राहिले आहेत ! रशियामध्ये गेलेले असताना त्यांनी ओंकारनाथ ठाकूरांची टप्प्यावर साथ केलेली आहे ! टप्प्यावर साथ ही साधी गोष्ट नव्हे ! निरनिराळ्या शास्त्रात सहजतेने पुरावे देऊन बोलणाऱ्यांच्या सहवासात मी वावरलेलो असल्यामुळे आता मला जेव्हा विद्वान म्हटले जाते तेव्हा मी मनोमन संकोचतो आणि 'विद्वत्तेवर काय प्रसंग आला आहे पहा, असे मला वाटते !!

फाटकांबरोबर आम्ही प्रवास केलाय. मी त्यांना डिवचलं, 'काय हो, गामा आणि गुंगा यांची कुस्ती झाली आणि गामाने अन्य मल्लांना पाडलं असे ऐकलं.' फाटक म्हणाले, 'ऐकलं काय, खरंच आहे ते.' 'कसं झालं असावं ते?' फाटक म्हणाले, 'बसा. सांगतो तुम्हाला.' कुस्तीमधे काय पेच असतात. फ्रीस्टाईल कशाला म्हणतात. त्यावरील पुस्तकांची नावेही सांगितली त्यांनी. म्हणाले, 'धोबीपछाड म्हणून एक पेच असतो. तो पेच त्याने घातल्यामुळे काही कळलं नाही त्या परदेशी मल्लाला. अशा कुस्त्यांचे इतिहास लिहायला हवेत आणि ते लिहिता येतील. कारण भोरला मी जेव्हा होतो त्यावेळेस दिवसेंदिवस कुस्त्यातच घालवलेत मी.'

सहज जाताना सांबर दिसलं, म्हणाले, 'पराडकर, बसा. हे सांबर जे आहे त्याला पकडतात कसं? या सांबरांच्या शिंगापासून पिशव्या तयार करतात. त्याचे कारखाने कुठे आहेत? त्याला पकडण्यासाठी कुठल्या क्लृप्त्या योजाव्या लागतात, हा सहज बोलताबोलता गाडीत निघालेला विषय आहे !!

या गोष्टींचं आज लोकांना नवल वाटतं. किंबहुना मी माझी रुईयाची अध्यापनाची १२ वर्षे सोनेरी का म्हणतो

याचं हे रहस्य आहे आणि आज मी यशस्वी प्राध्यापक म्हणून का गणला जातो याचं बरचसं श्रेयही त्या वर्षांनाच जातं.

त्यामुळे रुईया कॉलेज मला कधी सोडावे लागेल, अशी कल्पनाही मी केली नव्हती. कारण माझे गुरूच विभागाध्यक्ष होते आणि कामं सगळी मीच करीत होतो. तेव्हा विभागाध्यक्षाचा टिळा लागायला पाहिजे असं मला कधी वाटलं नाही आणि रुईया कॉलेजचे शिक्षक आणि विद्यार्थीही मी कॉलेज सोडून जाईन, याची कल्पनाही करीत नव्हते. परंतु अनपेक्षित गोष्टी घडतात. आणि १९५८ मध्ये ती गोष्ट घडली.... (क्रमशः)

**डॉ. मो. दि. पराडकर**
४/११, शाह बिल्डिंग,
भगत मार्ग, माहीम, मुंबई.
दूरध्वनी - २४३० १९६४

## डॉ. मो. दि. पराडकर अभिनन्दन ग्रंथ

वरील पुस्तक प्राच्य विद्या अभ्यास संस्थेने एप्रिल २००४ मध्ये प्रकाशित केले आहे. या पुस्तकात विद्वान लेखकांचे भारतीय संस्कृति, रामायण, महाभारत आदि विषयांवर संस्कृत, इंग्रजी, हिन्दी व मराठी भाषामध्ये मौलिक विचारांचे लेख आहेत. या पुस्तकाची किंमत २०० रुपये आहे. 'दिशा' च्या सभासदाना हे पुस्तक खालील पत्त्यावर १५०रुपयांना मिळेल. पोस्टाने हवे असल्यास पोस्टेज सह १८० रुपयाना मिळेल.

पत्ता : प्राच्य विद्या अभ्यास संस्था, शाहू मार्केट, १ला मजला, नौपाडा पोलिस स्टेशन समोर, महात्मा गांधी रोड, नौपाडा, ठाणे - २.

वेळ - सकाळी ११ ते ४

- संपादक

## वाचा-विचार करा-दुसऱ्यांना सांगा

१) दुसऱ्यांपासून ज्याची अपेक्षा आहे त्याची सुरुवात प्रथम तुम्हीच करा.

२) तुमचं सुख दुसऱ्यांच्या दुःखातून मिळवू नका.

३) दुसऱ्यांचं नशीब तुमचं असणार नाही. तुमचं कुठे आहे ते शोधा.

४) प्रत्येक बाबतींत तुमच्यापेक्षा कमी असलेल्या कडे पहा. आनंदी रहाल. मोठे समाधान मिळेल.

५) कसलाही अहंकार नको. नम्रता असू द्या.

६) यशाने उन्मत्त होऊ नका - अपयशाने खचू नका.

७) सत्यासाठी डोळ्यांचा वापर करा - कानांचा नको.

८) श्रद्धेने जगा - प्रेमाने दुसऱ्यांना जगवा.

९) लक्षात असू द्या, तुम्ही पृथ्वीवर काहीही आणलं नाही व काहीही बरोबर नेणार नाही.

# महाभारतातील समस्या

*महाभारत हा ग्रंथ कृष्णद्वैपायन व्यासांनी लिहिला. आजदेखील महाभारत हा एक अत्युत्कृष्ट ग्रंथ मानला जातो. त्यात राजनीती, तत्त्वज्ञान, तत्कालीन अध्यात्मिक प्रगती, आचार, शिक्षण, चालीरीती याचे प्रतिबिंब पडलेले आढळते. किंबहुना त्यातून त्याकाळच्या परिस्थितीचे बहुतांश चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. या महाभारतातील समस्या फार गहन आहेत. त्यातील काही समस्यांचा विज्ञान शाखेतील विद्यार्थिनींनी फाऊंडेशन कोर्सच्या प्रोजेक्टच्या निमित्ताने केलेला हा विचार. - संपादक*

कुठल्याही संस्कृतीला समाजरचनेचा पाया असतोच. महाभारताच्या काळात आणि त्यापूर्वीही अनेक राज्ये अस्तित्वात होती. त्यांना निश्चितच काहीतरी सामाजिक चौकट असणार. कुटुंब हा समाजाचा (सगळ्यात लहान) मूळ घटक आहे. अपरिहार्यपणे कुटुंबरचना अथवा कौटुंबिक नाती ही व्यवस्थितपणे निर्देशित असणार म्हणजेच कुटुंबात तत्कालिन शास्त्रदृष्ट्या काय योग्य व काय अयोग्य हे ठरवून दिलेले असणार. महाभारतातील केवळ पती-पत्नी अथवा वैवाहिक संबंधाचा विचार जरी केला तरी आपल्याला अनेक धक्कादायक गोष्टी लक्षात येतात, हिचाच आपण पहिली समस्या म्हणून विचार करणार आहोत.

दुसरी अशीच समस्या म्हणजे महाभारतातील विविध व्यक्तींचे वय. प्रत्येक व्यक्तीच्या वयाचा विचार केला असता, वयोमर्यादा खूप वाढते. इतकी वर्षे माणसे जगणे शक्य आहे का?

तिसरी समस्या म्हणजे संपूर्ण महाभारतात आपल्याला चमत्कृतिपूर्ण गोष्टींची रेलचेल आढळते. त्या सर्व गोष्टी शक्य आहेत का?

चवथी समस्या म्हणजे महायुद्धात जे सैन्य वापरले ते अक्षौहिणीच्या संख्येत मोजले आहे. एक अक्षौहिणी म्हणजे नक्की किती ?

**समस्या :** महाभारतातील स्त्री-पुरुष संबंधावरील नियंत्रण ? सामाजिक रचनेचे स्वरूप?

**स्वरूप :** वर उल्लेख केल्याप्रमाणे कुठल्याही संस्कृतीला, राज्याला समाजरचनेचा पाया हा असावाच लागतो. किंबहुना तो असल्याशिवाय राज्य अस्तित्वात येत नाही. मानवाच्या आयुष्यातील सगळ्यात महत्त्वाचा काळ म्हणजे तारुण्य. अशा उफाळत्या उत्साहावर नियंत्रण, निर्बंध आवश्यक असतानाच, महाभारतात स्त्री-पुरुष संबंधांवर कुठल्या प्रकारचे नियम लादले गेले होते का? असल्यास कोणत्या प्रकारचे? मग राज्यव्यवस्था अस्तित्वात कशी आली? सर्व माणसे विषयवासनेने लडबडलेली होती का? परंतु तत्कालिन आध्यात्मिक अवस्था देखील उच्च पातळीची होती? मग तो कशाचा परिणाम?

वरील सर्व प्रश्नांचा विचार करण्यासाठी प्रथम कुटुंबाची माहिती, प्रकार व उगम बघू.

**कुटुंबाचा उगम** - मानवाची उत्पती ते आजचा मानव इतक्या प्रचंड मानसिक परिवर्तनासाठी हजारो वर्षांचा कालावधी लागला. आदिमानवाच्यावेळी सगळ्यात प्रथम गरज ही अन्न, निवारा आणि संरक्षण याची होती. ती पूर्ण झाल्यानंतर प्रजनन करण्याची इच्छा निर्माण झाली. मानवी समाजाच्या सुरुवातीला कुटुंबसंस्था अस्तित्वात नव्हती. एक नियंत्रित पशूसदृश लैंगिक भेदाभेदशून्यता अस्तित्वात होती. याचा अर्थ एका स्त्रीसमूहाबरोबर एक पुरुषसमूह रहात होता. अशा समूहात माता, पिता, बंधू, भगिनी या संकल्पना अस्तित्वात नव्हत्या.

नंतर काही वर्षांनी थोड्या प्रगत अवस्थेत प्रसंगी स्त्रियांची देवाण-घेवाण, घरी येणाऱ्या पाहुण्याला स्त्रीची भेट हे सर्व प्रकार रूढ होते. किंबहुना ते आदर-सत्कार वा कर्तव्य म्हणून केले जात होते. काही प्राचीन जमातीत वृद्ध व्यक्तींना 'माता' अथवा 'पिता', समवयीन व्यक्तीला 'पती' अथवा 'पत्नी' आणि लहानग्यांना 'मुलगा' व 'मुलगी' म्हणून संबोधले जात असे.

**कुटुंबसंस्थेची निर्मिती आवश्यक आहे का?**

अपत्यनिर्मितीची आस हा विवाहाचा किंबहुना स्त्री-पुरुष संबंधाचा प्रमुख उद्देश आहे. अपत्यांचा अभाव हा ज्याप्रमाणे शारीरिक असमर्थता दर्शवितो त्याचप्रमाणे माता-पित्याच्या मानसिकतेत असंतुलन निर्माण करतो. याशिवाय लैंगिक वासना, माता वा पित्याच्या भूमिकेचे आकर्षण, आपल्या नंतरच्या पिढीला आपली संपत्ती वा आपल्या वंशाचा वारसा देण्याची इच्छा, आर्थिक सुरक्षततेची गरज, वार्धक्यात काळजी घेणारे आणि आपल्या संपूर्ण आयुष्यात आपली सुखदुःखे वाटण्यासाठी सोबत्याची आवश्यकता ही सर्व कारणे कुटुंबसंस्थेची निर्मिती आवश्यक आहे असे दर्शवितात.

**कुटुंबाचे पायाभूत घटक** - कुटुंब हे समंजसपणा, आत्मीयता, नाते आणि आर्थिक स्थैर्य या चार गुणांवर चालत असते. एखाद्या कुटुंबातील पतीला पत्नीकडून माया, मृदुता, मदत आणि त्यागाची अपेक्षा असते. पत्नीला पतीकडून प्रेम, आर्थिक सुरक्षितता आणि रक्षण यांची अपेक्षा असते. अपत्यजन्मावरोबरच पालकांचे स्वार्थी प्रेम निःस्वार्थी वात्सल्यात रुपांतरित होते. अपत्यास पालकांकडून प्रेम, शिक्षण, रक्षण याची अपेक्षा असते तर घरातील वृद्धांना आपल्या कर्त्या मुलाकडून आत्मीयता, काळजी घेणे आणि अहंकाराची जपणूक याची आवश्यकता असते.

**कुटुंबाचे प्रकार** - कुटुंबाचे प्रामुख्याने एकत्रित आणि विभक्त असे दोन प्रमुख प्रकार पडतात.

१) एकत्रित कुटुंब - अशा प्रकारच्या कुटुंबात अनेक पिढ्या एकत्रितपणे रहात असतात. म्हणजे आजी-आजोबा, पती-पत्नी आणि मुले हे एकत्रित कुटुंब होय.

२) विभक्त कुटुंब - ज्या कुटुंबात फक्त पती आणि पत्नी असतात अशा कुटुंबाला विभक्त कुटुंब म्हणतात. कुटुंबाचे आणखी दोन प्रकार म्हणजे मातृसत्ताक आणि पितृसत्ताक कुटुंबपद्धती.

१) मातृसत्ताक कुटुंबपद्धती - मातृसत्ताक म्हणजे मातेची पर्यायाने स्त्रीची सत्ता असलेले कुटुंब. अशा कुटुंबातील सर्व महत्त्वाचे निर्णय, आर्थिक व्यवहार, अपत्य संगोपन, व्यक्तींवरील अंकुश हे सर्व स्त्रीच्या इशाऱ्यावर होते.

२) पितृसत्ताक कुटुंबपद्धती यामध्ये घरातील नेतृत्व जेव्हा पुरुषाकडे दिले जाते तेव्हा ते पितृसत्ताक कुटुंब म्हटले जाते. वर्तमानकाळात पितृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात आहे.

याशिवाय जेव्हा पती आणि पत्नी यांचा विचार करतो तेव्हा बहुपतित्व आणि बहुपत्नित्वाचाही विचार केला पाहिजे.

बहुपतीत्व म्हणजे एका स्त्रीने अनेक पुरुषांबरोबर पतीसदृश व्यवहार करणे. पतीसदृश व्यवहार करणे म्हणजे केवळ संबंध ठेवणे असे नव्हे तर त्या स्त्रीच्या पालन रक्षणाची जबाबदारी त्या सर्व पुरुषांवर बंधनकारक असते. एखाद्या स्त्रीने अनेक भावांबरोबर विवाह करणे हा प्रकार उत्तर भारतातील काही जमातीत आढळतो. शिवाय अशा प्रकारची उदाहरणे जुनागड-बांवर ते कांग्रा दरी आणि तेथून हिंदुकुशापासून पुढे देखील आढळतात. (R. N. Saxena

- Social Economy of Polyandrous People) त्याशिवाय सिंधली, मुंडा, नमीव, व्हेनेझुएला येथील यारुरो जमातीत देखील आढळतो.

बहुपत्नीत्व म्हणजे एका पुरुषाने अनेक स्त्रियांना पत्नीचा दर्जा देणे. एका पुरुषाने अनेक स्त्रियांशी अथवा बहिर्णीशी विवाह करणे, हे क्रो आणि हिदास्ता इंडियन जमातीत रूढ आहे. बहुपत्नित्वाचाच एक भाग म्हणून एखाद्या पुरुषाने आपल्या भावाच्या विनापत्य विधवेचा अथवा विनापत्य विधुर पुरुषाने आपल्या मृत पत्नीच्या बहिणीचा पत्नी म्हणून स्वीकार केलेला चालतो.

परंतु बहुपत्नित्व म्हणजे रखेली ठेवणे अथवा वेश्या नव्हे. वेश्या व्यवसाय हा जेव्हा एखादा पुरुष अनेक स्त्रियांशी विवाहबाह्य संबंध ठेवतो तेव्हा उत्पन्न होतो. दुर्दैवाने तो आपल्या समाजाने स्वीकारलेला आहे.

**बहुपतित्व अथवा बहुपत्नित्वाचीकारणे** - जेव्हा एखाद्या नैसर्गिक वा मानवनिर्मित आपत्तीमुळे स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येपेक्षा जास्त वा कमी होते. तेव्हा बहुपतित्व वा बहुपत्नित्वाचा उगम होतो. स्त्री-पुरुष जन्मावर कुठलेही मानवी नियंत्रण ठेवले नाही तर निसर्गत: स्त्री अथवा पुरुष समान प्रमाणात जन्मतात. म्हणजेच निसर्ग एक पत्नीव्रताला प्राधान्य देतो. बहुपत्निक पुरुषाला तेवढे आर्थिक बळ असणे आवश्यक असते. काही वेळा स्त्रीचा वापर हा काम करून घेण्यासाठी किंवा आर्थिक गुंतवणूक करण्यासाठी होतो. जर आर्थिक सुबत्ता नसेल तर बहुपत्नीत्व अस्तित्वात येत नाही.

**बहुपत्नीत्वाचे परिणाम** - जे लोक अनेक स्त्रिया करतात, त्यांच्यात पुढील दोष आढळून येतात. सवतीत सामंजस्याचा अभाव, कलह, द्वेष, परिणामी हृदयभेदक अवस्था झालेली मुले, विसंगत स्वभाव, शेवटी कुटुंबाचा नाश.

या सर्व उपर्निर्दिष्ट गोष्टी महाभारतात घडलेल्या आहेत. परंतु आपण जेव्हा मानवाची उत्पत्ती आणि विकास यांचा मार्ग लक्षात घेतो तेव्हा समूह, बहुपतित्व आणि बहुपत्नित्व या सर्व वेगवेगळ्या अवस्था आहेत, असे दिसून येते.

महाभारतात बहुपतित्वाचे उदाहरण म्हणजे द्रौपदी व पांडव. बहुपत्नित्वाची तर अनेक उदाहरणे आपणास आढळतात. अर्जुन-द्रौपदी, सुभद्रा, उलुपी, चित्रांगदा. अनेक बहिर्णीशी एकाच पुरुषाने विवाह केल्याचे उदाहरण म्हणजे विचित्रवीर्य-अंबिका, अंबालिका. अनेक भावांशी एका स्त्रीचे पतीसदृश वागणे याचे उदाहरण देण्यासाठी पुन्हा पांडवांचे नाव घ्यावे लागेल. कुमारी माता सत्यवती आणि कुंती दोघी होत्या. देवांपासून पुत्रप्राप्तीचे उदाहरण म्हणजे कुंती-धर्म, वायू, इंद्र,सूर्य.

सत्यवती ही शंतनुची द्वितीय पत्नी, भीष्माची सापत्न माता. आत्यंतिक रूपसुंदर, तारुण्याने रसरसलेली एका कोळ्याची मुलगी. परंतु तिच्या सौंदर्याला गालबोट लावणारा एक दोष म्हणजे तिच्या सर्वांगाला मासळीची घाण येत होती. एकदा पाराशर मुनी तिच्या होडीत नदीतीर पार करण्यासाठी बसले. ते तिच्या अलौकिक लावण्याने मोहीत झाले. त्यांनी कसलाही विचार न करता तिच्याजवळ संगाची मागणी केली. तिची लज्जा दूर व्हावी म्हणून आजूबाजूला धुके निर्माण केले. तिला अभंग कौमार्याचे वरदान दिले आणि तिच्या सर्वांगाची दुर्गंधी दूर केली.

हे सर्व कशासाठी? तर स्वत:ची वासनापूर्ती करण्यासाठी. पराशर ऋषी तपोनिधी होते. मग स्वत:च्या तप:सामर्थ्याचा उपयोग त्यांनी इतक्या साध्या गोष्टीच्या प्राप्तीसाठी कसा केला? केला तरी त्या संबंधातनू निर्माण झालेला पुत्र जगत्वंद्य कसा ठरला? या व्यभिचारजन्य कानीन पुत्राचा समाजाने स्वीकार कसा केला? एका निष्पाप

कुमारिकेवर तप:सामर्थ्याची छाप पाडून तिच्याशी व्यभिचार करणे हे पराशर मुनींना अजिबात शोभत नाही. तरीही पराशर ऋषी समाजातील एक अग्रणी गणले गेले. अशा ऋषींविषयी आपल्या मनात आदर असतो. आपण त्यांच्याकडे पहाताना देखील निर्मळ मनाने आणि भक्तीने पाहतो. ते इंद्रजित असतात. त्यांनी सांसारिक भावनांवर नियंत्रण घातलेले असते. त्यांनी आपल्या शारीरिक विकासावर देखील नियंत्रण मिळविलेले असते. सत्यवतीने नकार देऊनसुद्धा पराशर तिला वराचे आमिष दाखवितात. वराच्या जोरावर आपली शारीरिक गरज भागवून घेणे ही अतिशय लज्जास्पद गोष्ट आहे. अशा मुनीपेक्षा मग सामान्य माणूस कितीतरी बरा जो आपले सामान्य असणे मान्य करून चुका मान्य करतो. ज्ञानेश्वराच्या पित्याने प्रत्यक्ष भगवंताच्या आज्ञेवरून परत गृहस्थाश्रम स्वीकारला तरी तत्कालीन समाजाने त्यास देहांताची शिक्षा दिली. मात्र पराशर मुनींना महान म्हणतो हे चूक आहे. बरे त्यावेळी अशा गोष्टी चालत होत्या मग सत्यवतीला अभंग कौमार्याचा वर देण्याची काहीच आवश्यकता नव्हती. हा वर दर्शवितो की त्यांच्या मनात ही गोष्ट उघड होईल याची भीती आहे. भीती ही वासनेचीच सावली नव्हे तर काय?

व्यासाचा जन्म एका द्वीपावर झाला म्हणून त्यांना कृष्णद्वैपायन व्यास हे नाव मिळाले. या पुत्राच्या जन्मानंतर सत्यवतीने शंतनूशी विवाह केला. शंतनुपासून तिला विचित्रवीर्य आणि चित्रांगद नावाचे दोन मुलगे झाले. चित्रांगद काही काळाने कालवश झाला. विचित्रवीर्य हा भीष्माचा सावत्र भाऊ. त्याने विचित्रवीर्यासाठी अंबा, अंबालिका आणि अंबिका या तीन बहिणींचे बलाने अपहरण केले. परंतु अंबेचे शाल्व राजावर प्रेम होते. म्हणून भीष्माने तिची सन्मानाने पाठवणी केली. अंबिका आणि अंबालिकेचा विवाह विचित्रवीर्याशी लावून दिला. हे बहुपत्नित्वाचे उदाहरण आहे. अंबा आणि अंबालिकेबरोबर विचित्रवीर्य फार काळ वास्तव्य करू शकला नाही. त्याचे काही काळाने प्राणोत्क्रमण झाले. त्याच्या मृत्युबरोबरच कुरुकुलाच्या वंशवृद्धीच्या सर्व वाटा बंद झाल्या. भीष्म विवाह न करण्याची प्रतिज्ञा करून बसलेला, विचित्रवीर्य आणि चित्रांगद दोघेही मृत. अशा स्थितीत सत्यवतीने एक निर्णय घेतला आणि व्यासांना बोलावले. अंबिका, अंबालिकेला त्यांच्यापासून पुत्रप्राप्ती करून घेण्याची आज्ञा केली.

व्यास हे अतिशय विद्वान असे ऋषी. मग त्यांनी असे कृत्य करण्यास संमती कशी दिली? शिवाय जेव्हा व्यासांना सत्यवतीने बोलावले तेव्हा सर्वांना ज्ञात झाले असणारच की सत्यवती कुमारी माता झाली होती. मग तिला तरी कशी मानमान्यता प्राप्त झाली? व्यासांनी स्वत:च्या भावजयशी संग करण्यास संमती कशी दिली? अशा संबंधांना व्यभिचार का म्हणू नये? असला संबंध जर आजच्या काळात सहन केला जात नाही, तर त्या काळात कसा मान्यता पावला? या संबंधातून उत्पन्न झालेले पुत्र, धृतराष्ट्र, पांडू आणि विदुर हे श्रेष्ठ पुरुष कसे गणले गेले?

याचे उत्तर म्हणजे विवाहपूर्व संबंधातून उत्पन्न झालेले पुत्र हा 'कानीन पुत्र' म्हणवला जात असे. त्याकाळी राजगादी पुढे चालवण्यासाठी पुत्राची नितांत आवश्यकता असे. त्याकाळी लोकसंख्या मर्यादित असल्यामुळे पुत्रोत्पत्तीला फार महत्त्व असे. नवीन प्रदेशात वसती करून ते प्रदेश प्रभुत्वाखाली आणण्यासाठी तसेच राष्ट्राचे रक्षण करण्यासाठी मनुष्य बळाची नितांत आवश्यकता असे. पुत्राला जन्म देणे हे त्याकाळी एक आद्य कर्तव्य आणि थोर समाजकार्य मानले जात असे. यामुळे नवऱ्यापासून मुलगा होण्याची शक्यता नसली अथवा पती मृत असला तरी अशा स्त्रियांनी इतर श्रेष्ठ पुरुषांशी संग करून मुलगा मिळवावा आणि निपुत्रिक विधवेनेही कुटुंबातील वडील माणसांच्या परवानगीने इतर पुरुषांपासून पुत्रप्राप्ती करून घ्यावी, ही प्रथा रुढ झाली आणि त्यालाच नियोगविधी म्हणतात.

नियोगविधी जरी मान्य असला तरी तो त्या काळात व्यभिचार म्हणून मानला जातच नव्हता. त्या काळी शिष्टसंमत आणि धर्मसंमत अशा नियोगविधीने हा संबंध झाला असल्यामुळे कोणीही आक्षेप घेतला नाही वा त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेलाही धक्का लागला नाही. शिवाय व्यास हे थोर मातृभक्त होते. तिच्या इच्छेखातरच तर त्यांनी हे कृत्य केले होते. शेवटी 'नीती नीती' म्हणजे तरी काय? समाजानेच समाजाच्या कल्याणासाठी रूढ केलेले नियमच तेव्हा सामाजिक गरज ही जास्त महत्त्वाची. म्हणूनच कालानुक्रमे सामाजिक नीती बदलत जाते. रूढ नियम बदलत जातात. सामाजिक प्रतिष्ठेच्या कल्पना बदलत जातात. म्हणूनच शेकडो वर्षांपूर्वीचे सामाजिक नियम आज लागू होत नाहीत. परंतु आताच्या काळात लोकसंख्येच्या वाढीची वा मनुष्यबळाची वा पुत्रोत्पत्तीची गरज नसून लोकसंख्येवर नियंत्रण घालण्याची गरज आहे. म्हणूनच आजच्या काळात स्त्रियांच्या पातिव्रत्याला कलंक लावणारा हा नियोग विधी अमान्य आहे. किंबहुना निंद्य, तिरस्करणीय व अनैतिक मानला जातो. म्हणूनच तो अधिकृतरित्या अस्तित्वात नाही.

प्राचीन काळी नियोगविधी धर्मसंमत होता, इष्ट होता. समाज धारणेस आवश्यक होता शिवाय ती त्यांच्या मातेची इच्छा होती म्हणून आणि केवळ म्हणूनच व्यासांनी अंबिका आणि अंबालिकेला पुत्रप्राप्ती करून देण्याचे मान्य केले. त्याकाळी अशा पुत्राला 'प्रणीत' पुत्र म्हणवले जात असे. प्रणीत अथवा कानीन पुत्र हे संपत्तीचे वाटेकरी असत. म्हणजेच जरी हे आताच्या काळात व्यभिचारी कृत्य मानले गेले असले तरी अशा पुत्रांना वाऱ्यावर सोडून न देता त्यांना समाजमान्यता आणि संपत्तीत हक्क दिलेला होता. ही व्यवस्था त्या काळच्या समाज व्यवस्थेचा सर्व लोकांचा सर्व परिस्थितीचा आणि सर्वांच्या पालनपोषणाचा विचार करण्याचा दृष्टिकोन दर्शविते.

आजचा समाज मात्र अशा पुत्रांना त्याज्य मानतो. अशा पुत्रांशी आपल्या मुलींचा विवाह करून देण्यास कुठल्याही चांगल्या घराण्याचे लोक तयार नसतात. हे एका बाजूस आपणास दिसून येते, तर दुसऱ्या बाजूला आपणाला असे दिसून येते. आजच्या लहान मुलांना ज्या सिनेतारका 'दिलोजानसे चाहता हूँ' इतक्या आवडतात थोडक्यात, ज्यांना आदर्श मानले जाते, त्या मात्र विवाहपूर्व किंवा विवाहबाह्य संबंध ठेवतात.

व्यासांपासून अंबिकेला धृतराष्ट्र आणि अंबालिकेला पंडू झाला. शिवाय दासीपासून विदुर नावाचा एक निकोप विद्वान पुत्र झाला. धृतराष्ट्र अंध तर पंडू हा अशक्त होता. धृतराष्ट्र हा अंध असल्यामुळे राज्याच्या गादीवर त्याच्याऐवजी पंडूला बसविण्यात आले. हा सल धृतराष्ट्राच्या मनात कायम राहिला. पंडूचा कुंतीशी कन्यादान प्राजापत्य विधीने विवाह झाला. पुढे त्याने मद्र देशाची राजकन्या माद्रीशीदेखील विवाह केला. हे बहुपत्नित्वाचे दुसरे उदाहरण होय.

पंडूने रतिक्रियेत मग्न असलेल्या हरिणांचा वध केला. परंतु ती हरणे म्हणजे मृगरूप धारण केलेले ब्राह्मण दांपत्य होते. त्या ब्राह्मणाने पंडूराजाला शाप दिला की, पंडूने जर आपल्या स्त्रियांशी समागम केला तर त्यास मृत्यू प्राप्त होईल. ही घटना घडली तोपर्यंत पंडूच्या दोन्ही राण्या कुंती आणि माद्री निपुत्रिक होत्या. पुनश्च वंशवृद्धीचा प्रश्न उभा ठाकला. त्याकाळच्या समाजरूढीला अनुसरून पंडूने कुंतीला दुसऱ्या श्रेष्ठ पुरुषांपासून पुत्रप्राप्ती करून घेण्याची परवानगी दिली. अशा रीतीने आपल्या वंशाचे रक्षण केले. आजच्या काळात देखील समाजात अशी व्यवस्था केली आहे की, एखादी स्त्री जर निर्दोष असेल आणि पती निसर्गत: अथवा अपघाताने अपत्य निर्माण करण्यास असमर्थ असेल तर पतीच्या संमतीने वीर्यदान केंद्राच्या मदतीने ती स्त्री आई होऊ शकते. या गोष्टींची माहिती गुप्त ठेवण्याची जबाबदारी

त्या केंद्राची आणि तेथील डॉक्टरांची असते ही कायद्यात तरतूद आहे.

कुंतीचा विचार करता पुन्हा आपणास कुमारी माता या विषयाला हात घालावा लागतो. दुर्वास मुनींची सर्व तंत्रे सांभाळून त्यांची उत्तम सेवा केल्याबद्दल कुंतीला त्यांनी एक मंत्र दिला. ज्यायोगे ती कुठल्याही देवपुरुषाला बोलावू शकेल आणि ज्याद्वारे पुत्रप्राप्ती होऊ शकेल.

आता दुर्वास मुनी हे अतिशय तपोसंपन्न ऋषी होते. मग वर देताना आपण कसला वर देतो आहोत? एका कुमारिकेला सुलभ पुत्रप्राप्तीचा वर देणे कितपत सयुक्तिक आहे? या गोष्टींचे तारतम्य दुर्वास ऋषींनी ठेवले नाही. आपल्या वरामुळे त्या गुणी मुलीचा पाय वाकडा पडण्याची शक्यता आहे. इतका साधा विचार देखील त्यांनी न करता 'केली सेवा दिला वर' असे केले. त्यांना ज्यायोगे कुंतीचे कल्याण होईल, तिला पुढे त्रास होणार नाही, तिची एखाद्या अनुरूप वराशी विवाह करण्याची इच्छापूर्ती, तिची आध्यात्मिक मार्गात उन्नत होईल, असा कोणत्याही वर देणे शक्य होते. परंतु ते त्यांनी केले नाही. कुंतीने विवाहापूर्वीच त्या मंत्राची प्रचीती बघण्यासाठी सूर्याला पाचारण केले आणि कर्णाची माता झाली. कर्ण हा देखील कानीन पुत्र होता. तो अधि-राधा या सुत दांपत्याचा कृत्रिम पुत्र म्हणून आयुष्य जगला. त्याचे 'कौंतेय' हे अस्तित्व अज्ञान असल्याने त्यास संपत्तीतदेखील वाटा मिळाला नाही. कुंतीने अशाच प्रकारे धर्म, इंद्र आणि वायू यांच्यापासून युधिष्ठिर, अर्जुन आणि भीम यांची प्राप्ती करून घेतली आणि माद्रीला तो मंत्र दिला. इथे कुंती आणि माद्री या सवती असल्या तरी देखील त्यांच्यात प्रेम, आत्मीयता होती, हे दिसून येते. किंबहुना त्या दोघी बहिणीप्रमाणेच राहात होत्या. अशा तऱ्हेने कुरुकुलास वंशजांची प्राप्ती झाली. युधिष्ठिराचा जन्म दुर्योधनाच्या आधी झाला असल्यामुळे राज्याचा वारस तोच होता.

कुंती आणि माद्री या दोघींचे मिळून पाच पुत्र यांना पांडव म्हटले जात असे. द्रौपदी स्वयंवराच्या वेळेस कुंती आणि हे पाची पुत्र ब्राह्मण वेशात रहात होते. द्रौपदी ही द्रुपदाची कन्या, यज्ञवेदीतून जन्मलेली, सावळ्या रंगाची, आत्यंतिक लावण्यवती. तिला जिंकणे उत्तम धनुर्धरालाच शक्य होते. पांडवांपैकी उत्तम धनुर्धर म्हणजे अर्जुन. त्याने पण जिंकून द्रौपदीला जिंकले परंतु द्रौपदीचे सौंदर्य इतर चार भावांना भुरळ घालत होते. कुंतीच्या लक्षात ही गोष्ट आली. तिला साहजिकच या पाच भावंडांची एकजूट तुटण्याची भीती वाटली. म्हणून तिने या पाची भावाचे द्रौपदीशी लग्न लावून दिले. कुंतीचे 'द्रौपदीला वाटून घ्या' असे सांगणे अथवा युधिष्ठिराची अग्निकाष्ठे भक्षण करण्याची गर्भित धमकी या गोष्टी महाभारतकाराचा प्रत्यक्षाहून प्रतिभा उत्कट करण्याचा प्रयत्न असावा. परंतु या पाचही भावांचे द्रौपदीशी लग्न झाले ही सत्य घटना आणि ती बहुपतित्व या वर्गवारीत मोडते.

बहुपतित्वाची चाल त्याकाळी अस्तित्वात नव्हती. हे सहज लक्षात येते. कारण पांडवांच्या आधीच्या तीन पिढ्यात आपल्याला बहुपतित्वाचे एकही उदाहरण आढळत नाही. कुंतीनेच मग फक्त असा क्रांतिकारी निर्णय कसा घेतला? पांडवांच्या आधीच्या पिढ्यात याचे कारण आपल्याला मिळते. मागे उल्लेख केल्याप्रमाणे धृतराष्ट्राच्या मनात पंडूला राजा केल्याबद्दलचा सल कायम होता. शिवाय शकुनीच्या आणि दुर्योधनाच्या कारवायांना त्याने कधीही विरोध केला नाही वा त्यांच्या विरुद्ध कोणताही कडक उपाय योजला नाही. यातूनच कुंतीच्या मनात आपल्या मुलांच्या जीविताविषयी असुरक्षितता निर्माण झाली असेल आणि जोपर्यंत हे पाचजण एकत्र असतील तोपर्यंत त्यांचे सामर्थ्य प्रभावशाली असेल म्हणून तिने त्यांचा विवाह द्रौपदीशी करून दिला. कदाचित तिला पुढे होणाऱ्या महायुद्धाची चाहुलही लागली असेल म्हणूनच तिने असा क्रांतिकारी

निर्णय घेतला आणि अंमलात आणला.

आता प्रश्न असा उभा राहतो की कोणीही या विवाहाला आक्षेप कसा घेतला नाही. एकतर हे राजघराणे होते. कुठल्याही राजाच्या एखाद्या विवक्षित कृतीला आक्षेप घेण्याचे धाडस प्रजाजन एकदम करीत नाहीत. मोठ्या लोकांची गोष्ट आहे म्हणून दुर्लक्ष करतात अथवा ते त्या राजाचे मिंधे असल्याने चालवून घेतात. असेही घडू शकते की बऱ्याचदा मोठ्या लोकांची गोष्ट म्हणून बऱ्याच चुकीच्या गोष्टी मान्य केल्या जातात.

हिमालय प्रदेशात अनेक भावांनी मिळून एक पत्नी करण्याची प्रथा होती. पांडवांचे बालपण त्याच प्रदेशात गेले असल्यामुळे त्यांना ही प्रथा गैर वाटत नव्हती. केवळ भारताच्याच नव्हे तर जगातील बहुतेक सर्व देशांच्या प्राचीन इतिहासात बहुपतित्वाची प्रथा आढळते. उत्तर व दक्षिण अमेरिका, आफ्रिका, न्यूझीलंड, पॅसिफिक बेटे अशा कित्येक भागात ती प्रथा प्राचीन काळी होती, याचे उल्लेख आढळतात. तिबेटात व हिमालयाच्या प्रदेशात ही प्रथा शिष्टमान्य होती. १८६० साली ब्रिटिश सरकारने लंकेमधील बहुपतित्वाची प्रथा बेकायदेशीर ठरवली तेव्हाच ती बंद झाली. निलगिरी पर्वतातील 'तोडा' जमातीतील ही प्रथा होती. केरळ प्रांतातील नायर लोकांत बहुपतित्वाची प्रथा फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. अजूनही त्यांनी ही प्रथा सोडून दिलेली नाही. लोकमताच्या विरोधामुळे आधुनिक काळात ही प्रथा लाजिरवाणी झाली असली तरी येथील ग्रामीण भागातील अशिक्षित नायर लोकांत अजूनही भावाभावांनी एकाच स्त्रीशी लग्न केलेले चालते.

परंतु पांडवांनी फक्त द्रौपदीशी लग्न केले असे नाही तर राजकीय लाभासाठी त्यांनी इतर अनेक राजांच्या मुलींशी विवाह केले. ज्यायोगे त्यांना सैन्यबळ मिळाले. यापैकी अर्जुनाने - उलुपी, चित्रांगदा, सुभद्रा तर भीमाने करेणमती, हिडिंबा या स्त्रियांशी विवाह केले.

बहुपतित्वाचे उदाहरण

द्रौपदी- युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव

बहुपत्नित्वाची उदाहरणे

विचित्रवीर्य - अंबिका, अंबालिका

पंडू - कुंती, माद्री

युधिष्ठिर - द्रौपदी, देविका

भीम - द्रौपदी, हिडिंबा, करेणमती

अर्जुन - द्रौपदी, सुभद्रा, चित्रांगदा, उलुपी

नकुल - द्रौपदी शिवाय आणखी एक राणी

सहदेव - द्रौपदी, जरासंधांची मुलगी

आणखी एक मुद्दा विचारात घेण्यासारखा म्हणजे जरी भरपूर राण्या असल्या तरी सगळ्यांचा दर्जा समान नव्हता, हे आपल्याला पुढील श्लोकात दिसून येते.

श्यामानां वरवर्णानां गौरीणामेकवाससाम् ।

दुर्योधनवरस्त्रीणां पश्य वृन्दानि केशव ॥

या श्लोकात दुर्योधनाच्या स्त्रियांचे अनेक वृन्द वर्णन केलेले आहे. राजांना पूर्वकाली अनेक स्त्रिया करण्याची परवानगी होती. क्षत्रियांना ब्राह्मणेतर वर्णाच्या स्त्रियांशी विवाह करता येत असे. परंतु यांचा दर्जा कमी असे. बरोबरीच्या राज्यातील राजस्त्रिया जर पत्नी म्हणून असतील तर त्या विशिष्ट दर्जाच्या राण्या मानल्या



जात असत. अशा राण्यांची संख्या फार थोडी असे. एकंदर उदाहरणांवरून अशा राण्या जास्तीत जास्त आठ असत.

**विवाहसंस्थेविषयी थोडेसे**

सर्व समाजाच्या उत्क्रांतीच्या इतिहासात असा एक काळ असतोच की जेव्हा समाजात विवाहाचा निर्बंध मुळीच असत नाही. अशा प्रकारची स्थिती भारतीय आर्य समाजाची एकेकाळी होती. उद्दालक ऋषींचा पुत्र श्वेतकेतू याने ही विवाहांची मर्यादा घालून दिली. त्याच्या मातेचा हात एका ब्राह्मणाने धरला म्हणून त्याने ही मर्यादा घालून दिली.

*भार्यान्तिथा व्युच्चरत: कौमारब्रह्मचारिणीम् ।*
*पतिव्रतामेतदेव भविता पातकं भुवि ॥*

*(आदिपर्व अ. १२२. श्लो २८)*

अर्थ : जी स्त्री भर्त्यव्यतिरिक्त अन्य पुरुषाशी रत होईल तिला भ्रूणहत्येचे पातक लागेल. शिवाय जो पुरुष स्व स्त्री सोडून दुसऱ्या स्त्रीशी रत होईल त्यासही हेच पातक लागेल.

परंतु भारतीय समाजात या दुसऱ्या नियमाची फारशी आठवणही नाही. पुरुषांना स्त्रियांप्रमाणेच व्यभिचाराचे पातक आहे, ही गोष्ट बहुधा ठाऊक नाही. धर्मशास्त्रात प्राचीन ऋषींनी घालून दिलेला नियम सारखाच लागू व न्याय्य आहे.

नियोगाची चाल आर्य समाजात होती मात्र तिला केव्हाही अनियंत्रित संबंधाचे स्वरूप नव्हते. प्राचीन काळापासून महाभारत काळापर्यंत विवाहसंस्थेची उत्क्रांती होऊन विवाहाला उदात्त स्वरूप प्राप्त झाले होते. सर्व स्त्रियांचे विवाह झालेच पाहिजेत, विवाहकाली स्त्रिया प्रौढ असाव्यात, त्यांचे कन्यात्व दूषित नसावे, एकदा पतीशी समागम झाल्यानंतर स्त्रियांनी त्याच पतीला दैवत मानून रहावे, त्यास दुसरा पती करण्याचा अधिकार नसावा. अर्थात् स्त्रियांस पुनर्विवाहाची बंदी नवरा जिवंत असताना असावी, अशा रीतीची उत्तम सांसारिक बंधने त्याकाळी अस्तित्वात होती. साहजिकच पती-पत्नीचे अत्यंत प्रेम व संसारसुख साधत असे. शिवाय विवाह प्रौढपणी होत असल्याने बालवैधव्याचाही प्रश्न नव्हता. परंतु काळाच्या ओघात या सर्व उत्तमोत्तम नीतींचा विसर पडून समाजाने स्वत:ची संकुचित अवस्था करून घेतली. आज आपण त्याच संकुचित अवस्थेपासून सुटका मिळविण्याचा प्रयत्न करीत आहोत.

आतापर्यंतच्या निरिक्षणातून उपलब्ध संदर्भग्रंथातून मिळालेल्या माहितीनुसार आपल्या प्रथम समस्येचे उत्तर असे मिळते की,

महाभारतकाली समाजव्यवस्था सुनियंत्रित होती, मात्र त्याकाळी बहुपत्नित्व आणि नियोगविधी या शास्त्रसमंत चाली होत्या. बहुपतित्व त्याकाळात हिमालयीन प्रदेशात अस्तित्वात होते. परंतु ती रुढ प्रथा नव्हती. तात्पर्य, समाजरचना संमिश्र स्वरुपाची होती.

- माधुरी पाटील, कीर्ती शिंगोटे,
- सुचेता जोशी, प्राची प्रधान,
- स्वाती वैशंपायन, पल्लवी जाधव

(या प्रथम वर्षाच्या १९९१-९२ च्या सुमारास असणाऱ्या विद्यार्थीनी होत्या)

# सार्वजनिक ग्रंथालयातील वाचकांची अभिरुची कशी वाढवावी

*सार्वजनिक ग्रंथालय हे आपल्या समाजाचे महत्त्वाचे अंग होय. या ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांची अभिरुची घडविण्यात ग्रंथपालाचे काम महत्त्वपूर्ण असते. या दृष्टीने या लेखात काही विचार व्यक्त झाले आहेत. - संपादक*

नाटककार शेक्सपिअरचा जन्म २३ एप्रिल १५६४ रोजी झाला. त्याचा मृत्यूही त्याच तारखेला म्हणजे २३ एप्रिल १६१६ रोजी झाला. असा दुहेरी महत्त्वाचा '२३ एप्रिल' हा दिवस जगभर 'वर्ल्ड बुक डे' म्हणजेच 'जागतिक पुस्तक दिवस' म्हणून पाळला जावा आणि त्या दिवशी ग्रंथगौरव करावा अशी सूचना युनेस्कोने केली. त्याप्रमाणे भारतातही '२३ एप्रिल' हा दिवस 'पुस्तक दिवस' म्हणून साजरा केला जातो.

ग्रंथालयांचे तीन प्रकार आहेत. सार्वजनिक, शालेय आणि विशेष. यापैकी सार्वजनिक ग्रंथालयासंदर्भात मी काही गोष्टी सांगणार आहे. म्हणजे सार्वजनिक ग्रंथालयातील वाचकांसंदर्भात काही बोलणार आहे.

सार्वजनिक ग्रंथालयात प्रत्येक वयोगटातील वाचक येत असतात. अगदी पाच वर्षांच्या मुलापासून ते थेट ऐंशी वर्षांच्या वृद्ध माणसापर्यंत. या प्रत्येक वाचकाची स्वत:ची अशी काही आवड असते. अभिरुची असते. काहींना नुसत्या कथा-कादंबऱ्या आवडतात तर काहींना काव्य, शास्त्रीय, प्रवासवर्णन, चरित्र, राजकीय या प्रकारची पुस्तकं आवडतात. या प्रत्येक वाचकाच्या मनाचा कल ओळखून त्याच्या अभिरुचीत बदल घडवून आणला पाहिजे. असा बदल वय वर्षे १५ ते ४० या दरम्यान जास्त चांगल्याप्रकारे घडवून आणता येईल. बालवाचकाला काही आपण कथा, कादंबऱ्या देणार नाही. तर त्यांच्यासाठी त्यांच्या वयाला अनुसरून अशी संस्कारक्षम, बोधपर, मनोरंजक अशी छोटी छोटी रामायण, महाभारत, इसापनिती, पंचतंत्र, अकबर-बिरबल, देशभक्त, संत अशी पुस्तकं द्यावीत. या वयातच त्यांना वाचनाची गोडी लागते. पुढे जाऊन हा बालवाचक मोठ्या विभागाचा वाचक होतो. आता या वयात त्याला काय वाचायला द्यायचं, त्याची अभिरुची कशी वाढवायची हे काम ग्रंथालयानी म्हणजेच पर्यायानी ग्रंथपालानीच करायचे असते. बरेचसे वाचक हे कथा, कादंबऱ्यामध्येच गुंतलेले दिसतात. त्यांना रोमँटिक, रहस्यमय व कौटुंबिक पुस्तकं वाचायला आवडतात. अशा वाचकांची आवड वृद्धिंगत केली पाहिजे. कुठलाही साहित्यप्रकार हा चांगला असतो. त्यातून काही ना काही चांगल्या गोष्टी मिळत असतात. काय घ्यायचं आणि काय नाही घ्यायचं हे शेवटी प्रत्येक वाचकावर अवलंबून असतं. एका साहित्याची कडी दुसऱ्या साहित्यात गुंफलेली असते. तेव्हा या वाचकाचा वाचन प्रवास हा लोकप्रिय साहित्याकडून दर्जेदार साहित्याकडे झाला पाहिजे. आता लोकप्रिय साहित्य म्हणजे काय आणि दर्जेदार साहित्य म्हणजे काय हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. लोकप्रिय साहित्य म्हणजे अशा प्रकारचं साहित्य ज्यात लेखकांनी वाचकाला प्रश्न विचारलेला असतो आणि त्याचं उत्तर त्यानीच पुढे जाऊन दिलेलं असतं. या उलट दर्जेदार साहित्यात लेखकानी वाचकापुढे एखादी समस्या, एखादा प्रश्न उपस्थित केलेला असतो आणि त्या समस्येचं अगर प्रश्नाचं समाधान स्वत: वाचकानीच शोधायचं असतं. म्हणजेच लोकप्रिय साहित्य वाचताना वाचकाला आपल्या बुद्धिमत्तेला ताण द्यावा लागत नाही. पण दर्जेदार साहित्याचे वाचन करताना मात्र वाचकाला आपल्या बुद्धीला, कल्पना शक्तीला ताण द्यावा लागतो.

थोर इतिहासकार वि. का. राजवाडे यांनी म्हटलेच आहे की,

''उत्तम ग्रंथाच्या वाचनाने माणसांच्या मनात विचारांचा खल सुरू होतो. चांगले विचार आपण प्रत्यक्ष आचरणात आणतो व त्यामुळे समाजाची उन्नती होते व आपल्या राष्ट्राची भरभराट होते.''

आता वाचकाची अभिरूची वाढवण्याचे काम हे ग्रंथपालानीच करायचे असते. ग्रंथपाल हा वाचक आणि पुस्तक या दोघांमधील दुवा आहे. तो प्रत्येक पुस्तकाला त्याचा वाचक व प्रत्येक वाचकाला त्याचे पुस्तक मिळवून देण्याचे कार्य करीत असतो. त्यामुळे ग्रंथपालाला प्रत्येक विषयाची माहिती असली पाहिजे. त्यांनी वाचकाला सांगितले पाहिजे की हे पुस्तक वाचा हे अतिशय सुंदर पुस्तक आहे. त्या पुस्तकाबद्दल त्यांनी वाचकांच्या मनात उत्सुकता निर्माण केली पाहिजे की ज्यायोगे वाचक स्वत: ते पुस्तक वाचेल. पण हे कधी शक्य होईल तर जेव्हा ग्रंथपाल हा स्वत: एक चांगला वाचक असेल तेव्हाच. त्याला बाजारात येणाऱ्या प्रत्येक नव्या पुस्तकाबद्दल व्यवस्थित माहिती असली पाहिजे.

ग्रंथालयात वेळोवेळी ग्रंथप्रदर्शन भरवली पाहिजेत. ही प्रदर्शनं मॅजिस्टिक, राजहंस, ग्रंथाली अशा गाजलेल्या प्रकाशन गृहांची भरवावीत. जेणेकरून वाचकांपुढे चांगली दर्जेदार पुस्तकं येतील आणि ती पुस्तकं वाचावीत असं वाचकांना वाटेल. या व्यतिरिक्त ग्रंथालयातील पुस्तकांचेदेखील प्रदर्शन भरवावे. त्यामुळे वाचकांना ग्रंथालयातील ग्रंथसंपदेचे ज्ञान होईल आणि ते ही पुस्तकं वाचण्यासाठी मागतील.

ग्रंथालयात नव्यानी येणाऱ्या पुस्तकांची यादी सूचना फलकावर लावली पाहिजे. त्यामुळे वाचकांना नवीन आलेल्या पुस्तकांची माहिती होईल. याव्यतिरिक्त वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या नव्या पुस्तकांच्या परिक्षणाची कात्रणेदेखील सूचनाफलकावर लावावीत. ती बघून वाचकांना ती पुस्तकं वाचण्याची उत्कंठा निर्माण होईल.

सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातूनही आपण वाचकांची अभिरूची वाढवण्याचे काम निश्चितपणे करू शकतो. वाचनालयात गाजलेल्या लेखकांशी वाचकांचे गप्पागोष्टींचे कार्यक्रम करता येतील. काव्य या प्रकाराबद्दल बरेचसे वाचक उदासीन असतात. पण अशा कार्यक्रमांमुळे काव्याच्या पुस्तकांचीही मागणी वाढेल.

वाचनालयात ग्रंथ निवड करताना वाचकांच्या मताचा उपयोग करता येईल. तसेच एखाद्या वाचकानी जर एखादे पुस्तक मागितले आणि ते पुस्तक जर आपल्या ग्रंथालयात नसेल तर अशा वेळी शक्य असेल तर ते आपण विकत घ्यावे. शक्य असेल तर अशासाठी की त्या पुस्तकाची किंमत खूप जास्त असू शकते तसेच ते पुस्तक बाजारात उपलब्ध नसू शकते. अशावेळी ते दुसऱ्या एखाद्या ग्रंथालयातून आपण स्वत: मिळवावे. त्यामुळे वाचकाला आनंद मिळतो त्याचा वाचनातील हुरूप वाढतो व ग्रंथालयाबद्दलचा त्याचा विश्वास पक्का होतो.

ललित मासिकात वाचकांकडून त्यांनी वर्षभरात कोणती पुस्तकं वाचली, त्यांना त्यातली कोणती पुस्तकं आवडली अशा स्वरूपाची पत्रं मागवली जातात. त्यातून चोखंदळ वाचकाची निवड केली जाते. त्यात काही नामांकित व्यक्तीसुद्धा आहेत. अशा व्यक्तींची नावे व त्यांना आवडलेली पुस्तकं यांची यादी ग्रंथालयात लावावी. त्यामुळे वाचकांमध्ये निश्चितपणे ती पुस्तकं वाचण्याची उत्सुकता निर्माण होईल.

याव्यतिरिक्त आपण दृक्-श्राव्य माध्यमाचादेखील वापर करून वाचकांची अभिरुची वाढवू शकू. साहित्य किंवा इतर विषयांवरचे लघुपट वाचकांना दाखवावेत. त्यामुळे त्या विषयाबद्दलची वाचकांची उत्सुकता वाढेल

(पान क्र. २८ वर)

# यंत्रालयाचा ज्ञानकोश – एक महान कार्य

*श्री. शंकर भिडे यांचा सदर कोश म्हणजे मराठी कोश साहित्यातील महत्वपूर्ण भर आहे. श्री. भिडे हे ठाण्याचे रहिवासी आहेत. - संपादक*

राज्य मराठी विकास संस्थेतर्फे एका महत्वपूर्ण ग्रंथाचे प्रकाशन गेल्या फेब्रुवारी महिन्यात झाले. तो ग्रंथ म्हणजे 'यंत्रालयाचा ज्ञानकोश' या ग्रंथाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यंत्रोपकरणे (Machine Tools) या विषयावरील इतक्या विस्तृत प्रमाणात आणि अद्ययावत माहिती देणारा भारतामधील हा पहिला ज्ञानकोश आहे. मराठीतच काय तर भारतातील इतर कोणत्याही भाषेत अशा प्रकारचा यंत्रकोश तयार झालेला नाही. इतकेच नाही तर इंग्रजीमध्ये देखील इतका परिपूर्ण असा ग्रंथकोश भारतात उपलब्ध नाही आणि या कोशाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे या कोशाचे संपादक/संकलक श्री. शंकर गोपाळ भिडे. कारण १११० पानांचा हा ज्ञानकोश तयार करण्यासाठी श्री. भिडे यांनी संकल्पित ज्ञानकोशाच्या नोंदींची प्राथमिक सूची बनविण्यापासून १११० पानांचे मुद्रण पूर्व हस्तलिखित तयार करण्यापर्यंत तसेच त्याच्या प्रकाशनासाठी विविध प्रकाशन संस्थांना पत्रव्यवहार करण्यापर्यंत सर्व जबाबदारी एकट्याने पार पाडली आहे.

३३ वर्षांपूर्वी अशा प्रकारचा कोश तयार केला पाहिजे, ही कल्पना त्यांच्या मनात आल्यानंतर त्यांनी स्वत:हूनच लगेच या प्रकल्पाची सुरुवात केली. कोश रचनाशास्त्र, व्युत्पतिशास्त्र संबंधात सखोल अभ्यास केला. ज्ञानकोश कसा असेल किंवा त्याचे स्वरूप कसे असेल, याची माहिती देणारे हस्तलिखित तयार करून विविध स्तरातील लोकांचे अभिप्राय घेतले. देशविदेशातील विश्वकोश संपादन क्षेत्रातील लोकांच्या भेटी घेतल्या. त्यांच्याशी चर्चा केली. लंडनच्या सायन्स म्युझिअम मधून यंत्रोपकरणे संदर्भात सुमारे ५०/७५ छायाचित्रे विकत घेतली आणि १९९४ मध्ये आळंदी येथील अजान वृक्षाखाली संकल्पित ज्ञान कोशाच्या पहिल्या नोंदीचे लेखन केले. प्रकाशनाचे सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर २५ फेब्रु. २००४ मध्ये डॉ. रघुनाथ मालशेकरांच्या हस्ते 'यंत्रालयाचा ज्ञानकोश' या ग्रंथाचे प्रकाशन होऊन श्री. भिडे यांनी नेटाने पार पाडलेल्या प्रकल्पाची पूर्ती झाली. या ज्ञानकोशाला डॉ. रघुनाथ मालशेकर यांची प्रस्तावना देखील लाभली आहे.




यंत्रालयाच्या ज्ञानकोशाचे स्वरूप आणि इतर वैशिष्ट्ये -

या ज्ञानकोशाची रचना ही इतर ज्ञानकोशाप्रमाणे वर्णानुक्रमेच आहे. या ज्ञानकोशामध्ये 'धातु कापणी यंत्रोपकरणे' (Metal Cutting Machine Tools) या प्रकारातील यंत्रांच्या संदर्भात माहिती दिलेली आहे. या मध्ये सर्व

प्रकारची यंत्रोपकरणे, कर्तन हत्यारे, प्रमापी, साधने या विषयीची माहिती आहे; खेरीज एखादे यंत्र कसे तयार केले. या मागचा इतिहास कोणी तयार केले त्या तज्ज्ञ, शास्त्रज्ञांबद्दलची माहिती, यंत्राची रचना, ज्या धातुचे हे यंत्र केले त्या धातुबद्दलची माहिती, गुणवत्ता नियंत्रण यंत्राच्या चलाचे सिद्धांत, तत्व, मापन परिमाणे, यंत्राचा उपयोग इ. सर्व माहिती या ज्ञानकोशामध्ये उपलब्ध आहे. या ज्ञानकोशामध्ये सुमारे १५०० आकृत्या आणि ४२५ पेक्षा अधिक मानकांची वर्गीकृत सूची यामध्ये आहे. भारतीय तांत्रिकी या विषयावर तर स्वतंत्र नोंद या ग्रंथात आढळते. यंत्रचालकांसाठी संक्षिप्त धातुशास्त्र याविषयी देखील माहिती या कोशात उपलब्ध आहे.

या ज्ञानकोशामध्ये सर्व महत्त्वाच्या नोंदींचे किंवा पारिभाषिक शब्दांचे पर्यायी इंग्रजी शब्द दिले आहेतव Rapid access साठी पारिभाषिक शब्दांच्या English - Marathi व Marathi-English अशा दोन्ही पारिभाषिक सूची यामध्ये दिल्या आहेत. तसेच नोंद नामसूची व Title Index देखील आहे.

या प्रकारातील यंत्रावर काम करणाऱ्या कामगारांसाठी हा ज्ञानकोश खूपच उपयुक्त आहे. तसेच ITच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच Engineering First Yearच्या विद्यार्थ्यांसाठी देखील उपयुक्त ठरू शकेल आणि प्रामुख्याने नव्याने या क्षेत्रात व्यवसाय सुरू करणाऱ्या व्यवसायिकांसाठी तर हा ग्रंथ खूपच माहितीपूर्ण ठरणार आहे.

सौ. दीपाली हिंदळेकर
वि.प्र.मंडळ संचलित व्यवस्थापन शास्त्रविभाग,
ठाणे

(पान क्र.२६ वरून)

## सार्वजनिक ग्रंथालयातील वाचकांची अभिरुची कशी वाढवावी

आणि त्या विषयाबद्दलची अधिकाधिक माहिती मिळवण्यासाठी वाचक पुस्तकांचा आधार घेतील. पण हा मार्ग खर्चिक आहे. प्रत्येक सार्वजनिक ग्रंथाला तो परवडण्यासारखा नाही.

नोव्हेंबर महिन्यात ग्रंथालयात ग्रंथसप्ताह साजरा केला जातो. त्या अंतर्गत निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा असे कार्यक्रम आयोजित करावेत.

यात सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या पुस्तकाचे बाह्यस्वरूप होय. वाचकाला पुस्तक वाचण्यासाठी देताना ते चांगल्या अवस्थेत असले पाहिजे. पुस्तक वाचनीय असेल पण ते खूप खराब झालेले असेल, फाटले असेल, त्याला वाळवी लागली असेल तर वाचकाला ते वाचता येणार नाही. तेव्हा ग्रंथपालानी या गोष्टीकडे काटेकोरपणे लक्ष दिले पाहिजेत. पण ग्रंथालयाबरोबरच वाचकानेही पुस्तक नीट वापरले पाहिजे. त्यातील पाने अगर चित्रे फाडून घेऊ नयेत. तसेच वाचकांनी स्वतःला सवय लावून घेतली पाहिजे की त्याने पुस्तक वाचताना प्रथम प्रस्तावना, लेखकाचे मनोगत या गोष्टीही वाचाव्यात. त्यामुळे पुस्तकाचा आशय-विषय पटकन कळण्यास मदतच होते.

तर माझ्या मते या सगळ्या गोष्टींमुळे आपण सार्वजनिक ग्रंथालयातील वाचकांची अभिरूची निश्चितपणे वाढवू शकू. धन्यवाद.

अंजली नारायण फडके
फडके बिल्डिंग, अहिल्याबाई चौक,
कल्याण - ४२१३०१.

# परिसर वार्ता

## तंत्रनिकेतनातर्फे मुजुमदार सरांना निरोप

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील प्राचार्य श्री. सी. श्री. मुजुमदार हे ३१मे रोजी सेवानिवृत्त झाले. त्या निमित्ताने २७मे २००४ रोजी तंत्रनिकेतनातर्फे निरोप समारंभ आयोजित केला होता.

प्राचार्य ए. वी. पाटील, इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, उल्हासनगर, प्राचार्य आर. के. नंदरगी, एस.एच. जोंधळे पॉलिटेक्निक, अंबरनाथ, प्राचार्य श्री. गणाचार्य, नवजीवन तंत्रनिकेनत असे इतर तंत्रनिकेतनातील प्राचार्यही श्री. मुजुमदार यांच्या सेवानिवृत्तीच्या समारंभासाठी आवर्जून उपस्थित होते. त्या सर्वांनी प्राचार्य मुजुमदार यांच्या संबधित असलेल्या आठवणी सांगितल्या. तसेच तंत्रनिकेतनातील उपप्राचार्य श्री. नायक यांनी प्राचार्य श्री. मुजुमदार यांच्या सहवासातील काही आठवणी सांगितल्या. तसेच प्राचार्य श्री. मुजुमदार यांची वैशिष्ट्ये सांगितली.

यानंतर प्रा. सौ. एन्. व्ही. बडेर (विभाग प्रमुख ई.पी. एस.), डॉ. सौ.आर. के. जांबोटकर, प्रा. सौ. एस्. के. आगाशे, प्रा. श्री. टी. व्ही. मोहिते-पाटील, प्रा. सौ. उषा राघवन, प्रा. सौ. एस्. एस्. जपे, प्रा. सौ. एस्. एम. गुप्ते, सौ. बी. ए. जोशी (ग्रंथालय) या त्यांच्या सहकाऱ्यांनी प्राचार्य मुजुमदार यांच्या कामासंदर्भात आलेले अनुभव व आठवणी सांगितल्या.




प्राचार्य श्री. मुजुमदार सेवानिवृत्तीच्या समारंभात आपले मनोगत व्यक्त करताना. सोबत उपप्राचार्य श्री. डी. के. नायक

प्राचार्य श्री. मुजुमदार यांनी आपल्या भाषणात स्त्री सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याचा उल्लेख करून त्याबद्दल धन्यवाद दिले. यानंतर विद्यार्थी प्रतिनीधींच्या वतीने रवींद्र तोडकर याने प्राचार्य मुजुमदार यांचा सत्कार केला. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातर्फे उपप्राचार्य श्री. नायक यांनी श्री. मुजुमदार यांचा सत्कार करून त्यांना भेटवस्तू दिली.

गेली अठरा वर्षे आपल्या तंत्रनिकेतनाचा विकास व्हावा व या तंत्रनिकेतनाला उत्तम लौकिक प्राप्त करून देण्यात प्राचार्य श्री. मुजुमदार यांचा सिंहाचा वाटा होता. प्राचार्य श्री. मुजुमदार यांची कुशल कार्यक्षमता व उत्तम नेतृत्वासाठी विद्या प्रसारक मंडळाने प्राचार्यांना 'मानपत्र' प्रदान केले आहे.

## विद्या प्रसारक मंडळा तर्फे मुजुमदार सरांना निरोप

'आपले छंद, आवडीनिवडी, आपली घरातील माणसे यांना त्यांना वेळ देता यावा म्हणून निवृत्तीची माणसाच्या आयुष्यात गरज असते.' असे उद्‌गार विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी काढले.

शनिवार दि. २९ मे रोजी सायंकाळी वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या दृक्‌श्राव्य विभागात प्राचार्य सी. श्री. मुजुमदार यांच्या निवृत्तीकरिता आयोजित केलेल्या समारंभाच्या अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. बेडेकर यांनी हे उद्‌गार काढले.

समारंभाच्या सुरुवातीस प्राचार्यपदाची सूत्रे हाती घेतलेल्या डी. के. नायक यांनी श्री. मुजुमदार सर आपल्याला गुरुस्थानी असल्याचे सांगून दीर्घ सहवासात त्यांना जाणवलेली स्वभाव वैशिष्ट्ये स्पष्ट केली. कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य स. वा. गोखले, बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर, विधी महाविद्यालयाच्या प्रभारी



कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर विद्या प्रसारक मंडळातर्फे प्राचार्य श्री. मुजुमदार यांना मानपत्र प्रदान करताना

प्राचार्या श्रीमती जे. श्रीविद्या, बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक, ठाणे भारत सहकारी बँकेचे अध्यक्ष व विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले या सर्वांची यावेळी मुजुमदारांना शुभेच्छा देणारी भाषणे झाली. विद्या प्रसारक मंडळातर्फे भेटवस्तू व मानपत्र देऊन श्री. मुजुमदार यांचा तर सौभाग्यलेणे देऊन सौ. मुजुमदार यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीमती राघवन तर सन्मानपत्राचे वाचन प्रा. श्रीमती वडेर यांनी केले. यावेळी मंडळातर्फे प्राचार्य नायक यांना स्वागतपर गुच्छ देण्यात आला.

समारंभास महाविद्यालय परिसरातील संस्था व विभागप्रमुख यांच्यासह विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी श्री. मा. ना. पाटील, श्री. दिलीप जोशी, मंडळाचे जुने आर्किटेक्ट श्री. पानसरे, श्री. दिलीपभाई व चंदुभाई, तंत्रनिकेतनातील कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

प्राचार्य मुजुमदार यांनी जून १९८६ पासून प्राचार्यपदाची धुरा यशस्वीरित्या सांभाळली होती.

<u>विद्या प्रसारक मंडळातर्फे प्राचार्य श्री. मुजुमदार यांना देण्यात आलेले मानपत्र</u>

महोदय,

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य म्हणून ३१ मे २००४ रोजी आपण निवृत्त होत आहात. गेली अठरा वर्षे आपण या परिसराशी एकरूप झाला होतात. दीड तपाच्या आपल्या सेवा काळात तंत्रनिकेतनाचा विकास व्हावा यासाठी आपण अहोरात्र कार्यरत होतात. भागुभाई मफतलाल तंत्रनिकेतन, रायगड तंत्रनिकेतन या व अशा ठिकाणच्या आपल्या अनुभवाचा आपण विद्या प्रसारक मंडळाला लाभ करून दिलात. महाराष्ट्रातील एक उत्तम तंत्रनिकेतन असा आज विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचा लौकिक आहे. असा लौकिक होण्यात आपला सिंहाचा वाटा आहे. शासनाचे विविध विभाग व विविध समित्या यासाठी आपण सादर केलेल्या शोधनिबंधाची आपल्या क्षेत्रात मोठी दखल घेतली गेली. ठाण्यातील 'कलर केम', 'वायर इंडिया', 'नोसिल' उद्योग समूहाचा आपल्या कार्यकुशलतेमुळे विद्या प्रसारक मंडळाशी संबंध आला. आपण लिहिलेली 'Unit Operation' व 'Unit Operations & Unit Processor' ही दोन्ही प्रकाशने विद्यार्थीप्रिय ठरली. सहकाऱ्यांना बरोबर नेत आपण केलेले कार्यक्रम हे आपल्या कुशल कार्यक्षमतेचे आणि सक्षम नेतृत्वाचे निदर्शक आहेत. विद्या प्रसारक मंडळाला आपल्या सेवेचा जो लाभ झाला त्याबद्दल मंडळ आपले सदैव ऋणी राहील. आपल्या सारख्या विद्यार्थीप्रिय शिक्षकांची सेवा हा विद्या प्रसारक मंडळाचा अभिमान विषय आहे. तत्प्रीत्यर्थ हे मानपत्र आम्ही आपणास प्रदान करीत आहोत.

**प्रा. डॉ. मोझेस कोलेट यांचा ठाणे येथील शायली मंडळातर्फे सत्कार**

ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बेडेकर महाविद्यालयातील विद्यार्थीप्रिय प्राध्यापक व राष्ट्रीय छात्रसेनेचे अधिकारी (एनसीसी ऑफिसर) लेफ्टनंट डॉ. मोझेस जो. कोलेट यांचे ग्रामीण जैवतंत्रज्ञान (रूरल बायोटेक्नॉलॉजी) या विषयातील संशोधनात्मक योगदान व डॉक्टरेट बद्दल शायली संस्थेतर्फे रविवार दि. १३ जून रोजी ठाण्याच्या ज्यूइश प्रार्थना मंदिरात गौरव करण्यात

आला. महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळाच्या प्रमुख, ठाणे जिल्ह्याच्या माजी जिल्हाधिकारी व आय.ए.एस्. अधिकारी डॉ. सौ. शंकरन् यांनी डॉ. कोलेट यांना गौरवचिन्ह व पुरस्कार देऊन सन्मानित केले. सदर कार्यक्रमास सुप्रसिद्ध लेखिका व समाजसेविका सौ. रेचल गडकर, ग्रंथाली चळवळीचे श्रीयुत भिडे, मुंबई पोलीस दलाच्या गुन्हा अन्वेषण विभागाचे माजी असिस्टंट कमिशनर व राष्ट्रपती पुरस्कार विजेते श्रीयुत सॅमसन, पोलीस दलातील माजी प्रशासकीय अधिकारी श्रीयुत गडकर व प्रार्थनालयाचे पदाधिकारी श्रीयुत एज्रा मोजेस उपस्थित होते. डॉ. कोलेट यांनी अलिकडेच डोंबिवली येथील डॉ. रविंद्र गंगाधर वागूल यांच्या कार्यक्षम मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट पूर्ण केली. व विशेष म्हणजे त्यांनी हेच संशोधनकार्य पुढे सुरू ठेवले आहे.

### प्रा. डॉ. मोझेस कोलेट - संशोधन मार्गदर्शक

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील प्राध्यापक व प्रपाठक डॉ. मोझेस यांना वनस्पती शास्त्रात संशोधनाद्वारे पदव्युत्तर पदवीसाठी काम करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक म्हणून काम करण्याची मुंबई विद्यापीठाने मान्यता दिली आहे. परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना (प्रश्नपत्रिकांद्वारे) ते १९९३ पासून अद्यापन करत होते. संशोधनाद्वारा पदव्युत्तर पदवी मिळविण्याची सोय फक्त मुंबई विद्यापीठात आहे व पीएच. डी. चे मागदर्शक म्हणून मान्यता मिळविण्यासाठी पदव्युत्तर पदवीसाठी मागदर्शन केलेले असणे ही आवश्यक बाब आहे.

डॉ. मोझेस कोलेट यांना अलीकडेच 'स्टडीज ऑफ सोल्युलोज डीग्रेडींग फन्जाय' या प्रबंधासाठी मुंबई विद्यापीठाची पीएच. डी. पदवी मिळाली आहे. तसेच विद्यापीठाने अर्थ सहाय्य केलेल्या एका प्रकल्पाचे कामही त्यांच्याकडे आहे. त्यांचे प्रमुख संशोधन कार्य ग्रामीण जैवतंत्रज्ञानाशी निगडीत आहे.

### ठाण्यात मराठीसाठी 'युनिकोड'चे प्रशिक्षण

इंटरनेटवरील भारतीय भाषांचा वापर वाढावा याकरिता आवश्यक असलेली युनिकोड प्रणाली आता मराठीसह सात भारतीय भाषांसाठी उपलब्ध असून, त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था ठाण्यातील विद्याप्रसारक मंडळाने केली आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या 'निबंधमाले'च्या टंकलेखनाने आज या प्रशिक्षणाची सुरुवात करण्यात आली.

विद्याप्रसारक मंडळाच्या महाविद्यालयांतील संस्कृत, ग्रंथालयशास्त्र, बीएससी-आयटी, डिप्लोमा कॉम्प्युटर सायन्स आणि डिप्लोमा 'आयटी'चे विद्यार्थी, शिक्षण व कर्मचाऱ्यांसाठी आज या प्रणालीचे प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले. प्रसिद्ध लिपीतज्ज्ञ र. कृ. जोशी यांच्या हस्ते या वर्गांचे उद्घाटन झाले. यावेळी अलका इराणी, मराठी शुद्धलेखन कोशकार अरुण फडके, ठाणे नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष मा. य. गोखले आदी मान्यवर उपस्थित होते. या वर्गांमध्ये श्री. फडके यांनी शुद्धलेखनाचेही प्रशिक्षण दिले. संस्थेतील विद्यार्थ्यांव्यतिरिक्त अन्य कोणालाही या प्रणालीचे प्रशिक्षण घ्यावयाचे असेल, तर त्यांनी आमच्याकडे नावे नोंदवावीत. त्यांच्यासाठीही आम्ही प्रशिक्षण वर्ग सुरू करू, असे संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी या वेळी सांगितले. तसेच विष्णुशास्त्रींची निबंधमाला लवकरच इंटरनेटवर उपलब्ध होईल, असेही ते म्हणाले.

संगणकावर भारतीय भाषांच्या वापराला जवळपास २० वर्षे झाली असली तरी टंक (फॉन्ट) आणि ऑपरेटिंग सिस्टिम्स यांचे प्रमाणीकरण झालेले नसल्याने त्यांच्या वापरात अडथळे येतात. इंटरनेटचा वापर वाढल्यानंतर हा प्रश्न अधिकच जटिल झालेला आहे. किंबहुना त्यामुळेच आजवर इंटरनेटवर भारतीय भाषांचा वापर फारसा वाढलेला नाही. त्यावर उपाय म्हणून रोमन व चिनी, जपानी आदी चित्रलिपींप्रमाणे भारतीय लिपीसुद्धा प्रमाणीकरणासाठी जगभरात सर्वत्र वापरल्या जाणाऱ्या युनिकोड प्रणालीवर उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न गेली काही वर्षे सुरू होते. सी-डॅक-मुंबई या संस्थेने आता संस्कृत, मराठी, हिंदी,

गुजराती, बंगाली, कन्नड व तमीळ या सात भारतीय भाषा या प्रणालीवर उपलब्ध करून दिल्या आहेत. जनमराठी, जनसंस्कृत अशा नावांनी या प्रणाली संगणकांवर उपलब्ध आहेत, अशी माहिती देऊन, वास्तविक ई-गव्हर्नन्स किंवा ज्ञानगंगोत्री जनसामान्यांपर्यंत पोचविण्याच्या घोषणा वास्तवात आणण्यासाठी सरकारने कार्यशाळा घेऊन या प्रणालीचे प्रशिक्षण द्यायला हवे, असे मत डॉ. बेडेकर यांनी या वेळी व्यक्त केले.

### बांदोडकरचा बी.एस्.सी.चा निकाल

विज्ञान महाविद्यालयाचा तृतीय वर्षाचा निकाल ९२.०३% लागला व या परिक्षेत 'संख्याशास्त्र' विषयाची कविता पाटील महाविद्यालयात सर्वप्रथम आली.

| | |
|---|---|
| प्रथम वर्गात | ११७ |
| द्वितीय वर्गात | १०५ |
| उत्तीर्ण वर्गात | ०९ |
| अनुत्तीर्ण | २० |

अशी आकडेवारी आहे. परीक्षेस बसलेल्या २५१ विद्यार्थ्यांपैकी २३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विषयवार प्रथम येणारे विद्यार्थी पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| संख्याशास्त्र | कविता पाटील |
| गणित | अनुश्री कदम |
| रसायनशास्त्र | किरणदेवी पुनिया |
| जीवशास्त्र | लक्ष्मी सिंग |
| वनस्पती शास्त्र | शमिका खानविलकर |
| पदार्थ विज्ञान | तेजा ठाकूर |

मुंबई विद्यापीठाचा निकाल ६८.०८% लागला आहे.

### बारावीचा उत्तम निकाल

जोशी-बेडेकर महाविद्यालय-वाणिज्य शाखा - या शाखेतून एकूण ५०५ विद्यार्थी परिक्षेस बसले होते. त्यापैकी प्रथम श्रेणी - २०५, द्वितीय श्रेणी - २०८, उत्तीर्ण श्रेणी - ५६ तर ३६ अनुत्तीर्ण झाले.

महाविद्यालयातून अरब तस्लीम इकबाल व वैभव हनुमंत माने हे ७९.०५% गुण मिळवून पहिले तर अश्विनी विश्वनाथ लाड व अनुप्रिता अनिल गावडे ७९.३३% गुण मिळवून दुसरे आले आहेत.

कला शाखा - या शाखेतून एकूण ३३७ विद्यार्थी परीक्षेस बसले होते त्यापैकी प्रथम श्रेणी - ५०, द्वितीय श्रेणी - १५२, उत्तीर्ण श्रेणी - ५३ तर ८२ अनुत्तीर्ण झाले.

महाविद्यालयातून गायत्री भूपेंद्र शिंदे ७६.३३% गुण मिळवून पहिली, आशा अशोक शिंदे ७५.८३% गुण मिळवून दुसरी तर स्वाती नंदकुमार धाग ७४.३३% गुण मिळवून तिसरी आली.

वाणिज्य शाखेचा निकाल ९२.८७% तर कला शाखेचा निकाल ७५.६६% इतका लागला. प्राचार्य स.वा. गोखले यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

### बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

या महाविद्यालयाचा समीर तळवडेकर बोर्डात १५ वा व गुणवत्ता यादीत ठाणे शहरातून आलेला एकमेव विद्यार्थी आहे. त्याने ६०० पैकी ५४९ गुण मिळविले असून त्याची टक्केवारी ९१.५०% इतकी आहे. याशिवाय अनुश्री सावंत हिला गणितात १०० पैकी १०० गुण तर राहुल येवले याला मराठीत १०० पैकी ८९ गुण मिळून ते बोर्डात त्या विषयात सर्वप्रथम आले आहेत.

महाविद्यालयातून एकूण ४८० विद्यार्थी परीक्षेस बसले होते, त्यापैकी १६८ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य, १७१ प्रथम श्रेणी, ९८ द्वितीय श्रेणी, १३ उत्तीर्ण श्रेणी आणि ३० अनुत्तीर्ण झाले. महाविद्यालयातून समीर तळवडेकर (९१.५०%) प्रथम, रिचा गुप्ता (८८.८३%) दुसरी तर ऋग्वेद वैद्य (८८.१७%) तिसरा आला.

विषयावर महाविद्यालयात प्रथम येणारे विद्यार्थी - इंग्रजी - प्रणव गुप्ते (८४ गुण), मराठी - राहुल येवले (८९), हिंदी - समीपा मुखर्जी (७९), गणित - अनुश्री सावंत (१००), पदार्थविज्ञान - वैभव लाडे (९८), रसायनशास्त्र

- शेहबाज अन्सारी (९६) आणि जीवशास्त्र - गौरवी पवार (९८ गुण)

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रभारी प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मकरंद दीक्षित यांनी अभिनंदन केले आहे.

### के. ग. जोशी कला महाविद्यालयाचा बी.ए.चा निकाल ९१.३८ टक्के

जोशी-बेडेकर महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला शाखेचा मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेचा निकाल अलिकडेच लागला असून परीक्षेस बसलेल्या ३२५ विद्यार्थ्यांपैकी २९७ विद्यार्थी (९१.३८%) उत्तीर्ण झाले आहेत. तत्त्वज्ञान विषय घेतलेला विनय शहा (६७.६६%) महाविद्यालयात पहिला तर भूगोल विषय घेतलेल्या वृपाली डहाळे व रोहिणी डोंबे अनुक्रमे ६६.१६% व ६५.८३% गुण मिळवून दुसऱ्या व तिसऱ्या आल्या. विषयनिहाय निकाल पुढीलप्रमाणे -

इंग्रजी - २५ पैकी २३ उत्तीर्ण (९२%), मराठी - १९ पैकी १९ उत्तीर्ण (१००%), हिंदी - १८ पैकी १७ उत्तीर्ण (९४.४४%), संस्कृत - ५ पैकी ५ उत्तीर्ण (१००%), अर्थशास्त्र - ७३ पैकी ६० उत्तीर्ण (८२.१९%), इतिहास - ५३ पैकी ५० उत्तीर्ण (९४.३३%), राज्यशास्त्र - ४५ पैकी ४१ उत्तीर्ण (९१.११%), तत्त्वज्ञान - २० पैकी १९ उत्तीर्ण (९५%), भूगोल - ६७ पैकी ६३ उत्तीर्ण (९४.०२%).

प्राचार्य स.वा. गोखले यांनी दिलेल्या माहितीनुसार विद्यापीठाचा निकाल ८३.५८% इतका आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयास नॅकचा बी++ हा दर्जा मिळाला आहे.

### दहावीचा दणदणीत निकाल

मुंबई विभागीय बोर्डातून शालान्त परीक्षेत आमच्या डॉ. बेडेकर विद्या मंदिरचा दुर्गेश अनिल देशपांडे हा ९४.४०% गुण मिळवून पहिला आला आणि दहावीच्या परीक्षेतील गुणवत्ता आमच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा सिद्ध करून दाखवली. दुर्गेश पहिला तर अनुजा श्रीपाद देशपांडे (९२.९३%) गुणवत्ता यादीत ११वी आली आहे. शाळेचा एकूण निकाल ९५.९८% इतका लागला.

**शाळेतील पहिले टॉप टेन पुढील प्रमाणे**

| क्र. | विद्यार्थी | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | दुर्गेश अनिल देशपांडे | ९४.४० |
| २ | अनुजा श्रीपाद देशपांडे | ९२.९३ |
| ३ | वैभव पांडुरंग भूमकर | ९१.३३ |
| ४ | प्रसाद प्रकाश बागवे | ९०.८० |
| ५ | सायली जयंत पाटील | ९०.५३ |
| ६ | सुशांत अनिल पाटील | ९०.४० |
| ७ | ज्योती शरद आमले | ८९.८६ |
| ८ | सुशांत बळीराम पाटील | ८९.६० |
| ९ | चिन्मयी शैलेश नागर्सेकर | ८९.३३ |
| १० | प्रियांका अशोक देशमुख | ८९.०६ |

दुर्गेश व अनुजाचे अभिनंदन व कौतुक करण्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर त्यांच्या पालकांसह बोर्डाच्या कार्यालयात उपस्थित होते. या दोघांना प्रत्यक्ष



भेटून अनेक राजकीय नेत्यांनी व नौपाड्यातील प्रतिष्ठित मंडळींनी त्यांचे अभिनंदन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. केळकर, सर्व सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी २२जून हा प्रचंड आनंदाचा दिवस होता!

दुर्गेशने आपल्या यशाचे श्रेय आपले पालक व आपली शाळा यांनी दिले आहे. इलेक्टॉनिकस् इंजिनियर होऊ इच्छणाऱ्या दुर्गेशची प्रगती व त्यातील टप्पे असे-

**शालेय व बहि:शाल प्रगती**

**पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा :**

१) सन १९९२-९३ पासून १९९७-९८ पर्यंत सहा वर्षे लहान शिशु ते ४थी.

२) प्रत्येक वर्षी वार्षिक परीक्षेत सर्व तुकड्यांतून सर्वप्रथम. या प्राविण्यामुळे -
   अ) शाळेने तीन सलग शालेय वर्षांकरिता फी माफ केली.
   ब) ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ, ठाणे व ब्राह्मण सेवा संघ, ठाणे यांच्या द्वारा पारितोषिक.

३) पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती प्राप्त, राज्य गुणवत्ता यादीत क्र. १३ (शहर विभाग)

४) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे-गणित प्रवेश परीक्षा (फेब्रुवारी १९९८) विशेष योग्यतेने प्रथम श्रेणी प्राप्त.

५) पाठांतर स्पर्धा
   अ) मनाचे श्लोक - श्री ज्ञानदेव सेवा मंडळ, ठाणे, आयोजित स्पर्धेत प्रथम क्रमांक.
   ब) मनाचे श्लोक (संस्कृत)-श्रीवत्स-बालमन्दिरम्, मुंबई आयोजित स्पर्धांमध्ये १९९४ व १९९५-९६ या दोन्ही वर्षी प्रथम पारितोषिक.

६) अन्य स्पर्धा
   अ) चित्रकला - पर्मनन्ट कलर कॉन्टेस्ट, आयोजित स्पर्धा, शालेय स्तर गट-उत्तेजनार्थ गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त.
   ब) अभिनय - कुमार कला केंद्र, मुंबई आयोजित आंतरशालेय नाट्यस्पर्धेमध्ये 'उत्कृष्ट अभिनेता' म्हणून स्मृतिचिन्ह प्राप्त
   क) वक्तृत्त्व - सैनिक सेवा समिती, आयोजित समूहगान स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त समूहात सहभाग.

**माध्यमिक शाळा -**

१) सन १९९८-९९ पासून आजपर्यंत (२००२-२००३) -पाच वर्षे-इयत्ता ५वी ते ९वी; प्रत्येक वर्षी वार्षिक परीक्षेत सर्व तुकड्यांतून सर्वप्रथम आणि निरनिराळ्या विषयांमध्ये सर्वप्रथम;

२) ठाणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ, ठाणे आयोजित संबोध व प्रावीण्य ह्या गणित परीक्षांमध्ये (इयत्ता ५/८स्तर) विशेष / प्रथम श्रेणी प्राप्त;

३) महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळ, आयोजित गणित प्रज्ञा स्पर्धा (इयत्ता ५/८स्तर) दोन्ही स्पर्धांमध्ये विशेष प्रावीण्य प्राप्त;

४) महाराष्ट्र राज्यभाषा, पुणे आयोजित राष्ट्रभाषा - बालबोधिनी परीक्षेत विशेष योग्यता श्रेणी.

५) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे आयोजित-
   अ) इंग्रजी प्री एलिमेंटरी परीक्षा-विशेष योग्यतेने प्रथम श्रेणी;
   ब) इंग्रजी एलिमेंटरी परीक्षा-विद्यापीठात सर्व प्रथम; पारितोपिक रु. १००/- रोख प्राप्त.

६) रामायण कथा अभ्यास समिती, ठाणे मण्डलम् - प्रमाण परीक्षेमध्ये प्रथम श्रेणी.

७) डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा (इ. ६वी) - सुवर्ण पदक.

८) माध्यमिक शिष्यवृत्ती प्राप्त - राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत (शहर विभाग) तृतीय क्रमाक, ठाणे जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक.

९) नेहरू विज्ञान केंद्र आयोजित सुटीतील विज्ञान कार्यशाळेत सहभाग, पेशीजीवशास्त्रविषयक प्रकल्पात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक.

१०) नेहरू विज्ञान केंद्र आयोजित सुटीतील विज्ञान कार्यशाळेत व प्रकल्परचनेत सहभाग.

११) ब्राह्मण सेवा संघ, ठाणे, आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेत सर्वप्रथम.

१२) देशस्त ऋग्वेदी ब्राह्मण संघ, ठाणे, पुरस्कृत 'कोण ठरेल बृहस्पती' स्पर्धेत सर्वप्रथम.

१३) अल्फा टी.व्ही. मराठी वाहिनीवरील 'अल्फा स्कॉलर्स' स्पर्धेमध्ये शाळेतर्फे सहभाग- प्राथमिक फेरीत विजयी.

१४) पाठान्तर स्पर्धा - गीता प्रतिष्ठान आयोजित 'गीताश्री' पाठान्तर परीक्षा (सप्टेंबर १९९९ व फेब्रुवारी २०००

दोन्ही परीक्षांमध्ये विशेष श्रेणी;

१५) अभिनय - कुमार कला केंद्र आयोजित आंतरशालेय एकांकिका स्पर्धा - १९९९ ते २००० - दोन्ही स्पर्धांमध्ये वैयक्तिक प्रशस्तिपत्रक प्राप्त;

१६) वक्तृत्व स्पर्धा -

अ) कै. लक्ष्मीबाई रानडे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा (२००२) गुणानुक्रमे उत्तेजनार्थ क्रमांक व नैपुण्याबद्दल प्रशस्तिपत्रक;

ब) भारतीय जनप्रबोधिनी, ठाणे, आयोजित स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक;

क) टिळक पुण्यतिथीनिमित्त शाळेने आयोजिलेल्या वार्षिक आंतरवर्गीय स्पर्धांमध्ये १९९९ व २००० या दोन्ही वर्षी प्रथम क्रमांक.

१७) क्रीडा स्पर्धा - शालेय क्रीडा महोत्सव - १९९८ (लंगडी), २००१ (क्रिकेट) व २००२ (क्रिकेट) यांच्या अनुक्रमे विजयी, उपविजयी व विजयी संघामध्ये सहभाग.

१८) साहस प्रशिक्षण -

अ) गुणवत्ता प्रमाणपत्र - B+ श्रेणी दि. ३१ ऑगस्ट १९९८

ब) प्रशस्तिपत्र - निसर्ग गिरीभ्रमण - २१ ते २५ एप्रिल २००२.

१९) इतर स्पर्धा / परीक्षा इ. -

अ) अक्षरलेखन - कुमार कला केंद्र, आयोजित आंतरशालेय स्पर्धेत विशेष गुणवत्ता

ब) चित्रकला -ऑल इंडिया कॅमेल कॉन्टेस्ट ९८, सहभाग - गट 'ड'

क) सूत्रसंचालन - शाळेतील कार्यानुभव प्रकल्पाचे;

ड) निधीसंकलन - वृद्ध सेवा संघ - वर्ष २००० विशेष परिश्रम गुणवत्ता प्रमाणपत्र.

इ) तबलावादन - अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई- आयोजित स्पर्धा

प्रवेशिका प्रथम - श्रेणी ॥

प्रवेशिका पूर्ण - श्रेणी I, विशेष योग्यता पात्र

२०) लेख - वार्षिक 'पारिजातक' मध्ये प्रसिद्ध झालेले -

अ) वक्तृत्वस्पर्धेतील पारितोषिकप्राप्त भाषणे -

१) वाचाल तर वाचाल - १९९८-९९

२) सार्वजनिक गणेशोत्सव काल आणि आज - २०००-२००१

ब) इतर लेख-

१) धारदार लेखणीचा गौरव - २००१-०२ (आधारित)

दिनांक १२ डिसेंबर २००२ दु. अ. देशपांडे

### ..... आणि आमची ए. के. जोशी

आमच्याच संस्थेच्या कै. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतही असाच सणाचा दिवस ठरला २२ जून!

गौतमी नेवाळकर आणि प्रियंका बनसोड या आमच्या विद्यार्थिनी गुणवत्ता यादीत ९२.४०% गुण मिळवून १५व्या क्रमांकावर आल्या. शिवाय आमच्या या शाळेचे खास वैशिष्ट्य म्हणजे गेली अनेक वर्षे शाळेचा निकाल १००% लागतोच ! शाळेतील सर्व शिक्षक व सहकाऱ्यांचे श्रम या निकालातून सातत्याने प्रतिबिंबित होत आहेत.

यंदा १६२ विद्यार्थी बसले होते त्यांची टक्केवारी पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| ९०% हून अधिक | ७ |
| ८५ ते ९०% | २९ |
| ७५ ते ८४% | ६२ |
| ६० ते ७४% | ४८ |
| ४५ ते ५९% | १९ |
| ४५ हून कमी | ०१ |